पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १९४ ■ मंगळवार, दि.२० जानेवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com




# 35 लाख नोकऱ्यांची संधी





## राज्याच्या औद्योगिक विकासाला वेग मिळणार फडणविसांचा दावोसमध्ये कोट्यवधींचे करार

प्रतिनिधी २० जानेवारी

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत प्रतिनिधीमंडळासमवेत वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीकरिता स्वित्झर्लंडमधील दावोस येथे दाखल झाले आहेत. फडणवीस यांनी वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये राज्यासाठी मोठी गुंतवणुक मिळवली आहे.

स्वित्झर्लंडमधील दावोसमध्ये मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र सरकार, एमएमआरडीए आणि आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये अनेक सामंजस्य करार करण्यात आले. त्यांनी आतापर्यंत ७ लाख कोटींचा करार दावोसमध्ये केला आहे. याद्वारे उद्योग, पायाभूत सुविधा, रिअल इस्टेट, स्मार्ट सिटी क्षेत्रात अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक महाराष्ट्रात येणार आहे. यामुळे राज्याच्या औद्योगिक विकासाला वेग मिळणार आहे.

गेल्या दशकात महाराष्ट्राने सातत्याने १० टक्क्यांहून अधिक विकासदर राखला असून हीच गती कायम राहिल्यास, २०३२ ऐवजी २०३० पर्यंतच महाराष्ट्र १ ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनण्याचे उद्दिष्ट गाठेल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात एज्यु-सिटी, इनोव्हेशन सिटी, स्पोर्ट्स सिटी आणि मेडिसिटी यांसारखे महत्त्वाकांक्षी प्रकल्प उभारले जात आहेत. या क्लस्टरमुळे सुमारे ३५ लाख उच्च वेतनाच्या नोकऱ्या निर्माण होतील, असा अंदाज मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. स्वित्झर्लंडमधील दावोस येथे आयोजित वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीत ते बोलत होते.तसेच जागतिक स्तरावर महाराष्ट्राची विश्वासार्हता पुन्हा एकदा अधोरेखित झाली असून, विदेशी गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र हे भारताचे खरे 'गेटवे ऑफ इंडिया' आहे, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले आहे. सुमारे १० ते १२ विविध क्षेत्रांतील उद्योगांशी सध्या समन्वय साधला जात आहे.

### दावोस करारांच्या बाबतीत ७५ ते ८० टक्क्यांपर्यंत पोहोचले

◆ दरम्यान, गेल्या वर्षी महाराष्ट्रात तब्बल १६ लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार झाले. यात प्रत्यक्ष गुंतवणुकीत रूपांतरित व्हावेत यासाठी राज्याने स्वतंत्र ट्रॅकिंग यंत्रणा उभारली आहे. देशपातळीवर जिथे सामंजस्य करारांचे रूपांतरण प्रमाण २५ ते ३० टक्के असते, तिथे महाराष्ट्रात हे प्रमाण ५० ते ५५ टक्के असून, दावोस करारांच्या बाबतीत ७५ ते ८० टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. जमीन वाटप, मंजुरी प्रक्रिया, तसेच 'वॉर रूम'च्या माध्यमातून प्रत्येक गुंतवणूकदाराला उद्योग क्षेत्राशी जोडून ठेवण्यात येत असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), डेटा, फ्रंटियर टेक्नॉलॉजी या क्षेत्रांमध्ये भारत, विशेषतः महाराष्ट्र आघाडी घेऊ शकतो. त्याचबरोबर, महाराष्ट्रात देशातील ६० टक्के डेटा सेंटर क्षमता असून, महाराष्ट्र आता भारताची 'डेटा सेंटर कॅपिटल' बनले आहे. हरित ऊर्जेवर आधारित, उच्च दर्जाची वीजपुरवठा व्यवस्था उभारून ही क्षमता आणखी वाढवली जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# अकोल्यात 'ऑपरेशन लोटस' अवघ्या काही तासांत फेल

♦ आमदार नितीन देशमुखांनी शिवसेनेचे शिलेदार केले मीडियासमोर उभे !

प्रतिनिधी २० जानेवारी

**अकोला :** राज्याच्या राजकारणात 'सुरत' आणि 'गुवाहाटी'च्या आठवणी ताज्या असतानाच, अकोला महापालिकेतही तसाच प्रयोग करण्याचा प्रयत्न भाजपकडून झाला. मात्र, स्वतः सुरत प्रकरणाचे साक्षीदार राहिलेले शिवसेना (उबाठा) आमदार नितीन देशमुख यांनी हा प्रयत्न हाणून पाडला आहे. रात्रीतून गायब झालेल्या नगरसेवकांना एकत्र आणून त्यांनी सर्व ६ नगरसेवकांना मीडियासमोर उभे करत भाजपला चोख प्रत्युत्तर दिले आहे.





### आमदार नितीन देशमुखांचा 'सुरत' अनुभव कामी आला?

आमदार नितीन देशमुख यांनी स्वतः सुरत ते गुवाहाटी आणि तिथून नागपूर मार्गे अकोल्यात वापसी केली होती. या 'सुरत पॅटर्न'चा अनुभव पाठीशी असल्याने त्यांनी अत्यंत वेगाने हालचाली केल्या. गायब झालेले नगरसेवक एखाद्या 'थंड हवेच्या ठिकाणी' हलवण्यात आल्याची चर्चा असतानाच, देशमुखांनी विजय इंगळे, सागर भारुका, मनोज पाटील, सोनाली सरोदे, सुरेखा काळे आणि अभय खुमकर या सहाही नगरसेवकांना एकत्र आणून 'पार्टी अभी बाकी है' असा संकेत दिला.

अकोला महापालिकेत २२ जानेवारी रोजी आरक्षण जाहीर होणार आहे. त्यापूर्वीच स्थायी समिती गठनासाठी भाजपने कंबर कसली असून, शिवसेनेचे ४ नगरसेवक फोडण्याचे प्रयत्न सुरू झाले होते. शिवसेना (उबाठा) कडे एकूण ६ नगरसेवक असून, पक्षफुटीची कारवाई टाळण्यासाठी किमान ४ नगरसेवकांची भाजपला गरज होती. रात्रीच्या वेळी काही नगरसेवक 'नॉट रिचेबल' झाल्याने शहरात 'ऑपरेशन लोटस'ची चर्चा रंगली होती.

### आमच्या नगरसेवकांची गरज कोणाला ? पक्ष ठरवणार!

◆मीडियासमोर नगरसेवकांना उभे करताना आमदार देशमुख यांनी स्पष्ट केले की, 'काँग्रेस असो वा भाजप, कोणाला आमच्या नगरसेवकांची गरज आहे हे पक्षश्रेष्ठी ठरवतील.' या विधानामुळे अकोल्याच्या राजकारणात आता शिवसेना (उबाठा) किंगमेकरच्या भूमिकेत आली असल्याचे दिसत आहे. भाजपला सत्ता स्थापनेसाठी शिवसेनेच्या ४ नगरसेवकांची आवश्यकता होती. रात्रीच्या वेळी काही नगरसेवक गायब झाल्याने खळबळ उडाली होती. आमदार नितीन देशमुखांनी सर्व सहाही नगरसेवकांना मीडियासमोर आणून अफवांना पूर्णविराम दिला.

# ज्येष्ठ विचारवंत गोविंद पानसरे खून प्रकरणातील संशयित आरोपीचा मृत्यू

प्रतिनिधी २० जानेवारी

**पुणे :** पुरोगामी नेते, ज्येष्ठ विचारवंत गोविंद पानसरे खून प्रकरणात मोठी बातमी समोर आली आहे. गोविंद पानसरे खून प्रकरणातील संशयित आरोपी समीर गायकवाड याचा मृत्यू झाल्याचं माहिती आहे.

समीर गायकवाडवर आरोपपत्र दाखल करण्यात आलं होतं. गेल्या दहा वर्षांपासून हे प्रकरण सुरू आहे. मात्र निकाल लागण्यापूर्वीच समीर गायकवाडचा मृत्यू झाला आहे. १६ फेब्रुवारी २०१५ रोजी कोल्हापुरमध्ये कॉम्रेड गोविंद पानसरे यांची त्यांच्या घराजवळ हत्या करण्यात आली होती. सकाळच्या वेळेत घराजवळ अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. त्यानंतर चार दिवसांनी २० फेब्रुवारी २०१५ रोजी ते मरण पावले. या प्रकरणात १० संशयितांपैकी समीर गायकवाड हा एक होता. समीर गायकवाड याचा संबंध सनातन संस्थेशी होता.

### हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू...

◆गोविंद पानसरे खून प्रकरणातील संशयित आरोपी समीर गायकवाड याचा हृदयविकाराच्या धक्क्याने मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. सांगलीतील घरात समीर गायकवाड याचा मृत्यू झाला. १६ फेब्रुवारी २०१५ रोजी कोल्हापूर येथे झालेल्या गोविंदराव पानसरे यांच्या हत्या प्रकरणी समीर गायकवाड संशयित आरोपी होता.

# मुंबईचा महापौर भाजपचाच हवा !

प्रतिनिधी २० जानेवारी

**मुंबई :** पहिल्यांदाच बृहन्मुंबई महानगरपालिकेची निवडणूक जिंकून मुंबई काबीज करणाऱ्या भाजपसमोर महापौरपदावरुन नवी डोकेदुखी उभी राहिली आहे. यंदा भाजपने कोणत्याही परिस्थितीत आपल्या पक्षाचा महापौर मुंबई महानगरपालिकेत बसवायचाच, असा चंग बांधला होता. मात्र, भाजपला निवडणुकीत ८९ जागाच जिंकता आल्या. त्यामुळे ११४ हा बहुमताचा आकडा गाठण्यासाठी भाजपला एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या २९ नगरसेवकांची गरज लागणार आहे. भाजपची हीच अडचण ओळखून एकनाथ शिंदे यांनी मुंबई महानगरपालिकेचे महापौरपद पहिल्या अडीच वर्षांसाठी आपल्याला मिळावे आणि स्थायी व इतर समित्यांमध्ये योग्य वाटा मिळावा, अशी भूमिका घेतली होती. त्यामुळे भाजप आणि शिंदे सेनेत तणाव निर्माण झाला असतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिल्लीतील पक्षश्रेष्ठींनी महत्त्वाचा संदेश पाठवला आहे. त्यानुसार भाजप मुंबईच्या महापौरपदाबाबत कोणतीही तडजोड करायला तयार नाही. मुंबई महानगरपालिकेत भाजपने अधिक जागा जिंकल्या असून भाजप हा सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. त्यामुळे मुंबईच्या महापौरपदावर आपलाच हक्क असल्याचे मित्रपक्षांना सांगा, असा स्पष्ट संदेश भाजपच्या दिल्लीतील नेतृत्वाने देवेंद्र फडणवीस यांना दिल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे. भाजपला मोठ्या प्रतीक्षेनंतर मुंबई महानगरपालिकेत इतके निर्णायक आणि मोठे यश मिळाले आहे. त्यामुळे महापौरपदावर भाजपचाच हक्क कसा आहे, ही भूमिका मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेसमोर मांडा. मात्र, हे करताना कोणतीही कटुता येणार नाही, याचीही दक्षता घ्या, असे भाजपच्या पक्षनेतृत्वाने देवेंद्र फडणवीस यांना कळवल्याची माहिती आहे. मुंबई महापौरपद आपल्याकडेच यायला हवे, ही भाजपच्या हजारो कार्यकर्त्यांची भावना आहे. या भावनेचा सन्मान केला पाहिजे. ही गोष्ट शिंदे सेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला पटवून द्या. याशिवाय, मुंबई महानगरपालिकेतील अन्य पदे आणि अन्य महानगरपालिकांमध्ये शिंदे गट आणि राष्ट्रवादीशी चर्चा करुन सन्मानजनक तोडगा काढा, असेही भाजपच्या नेतृत्त्वाने देवेंद्र फडणवीसांना सांगितले आहे.

देवेंद्र फडणवीसांना दिल्लीतून आदेश आला, शिंदे सेनेच्या आकांक्षांना सुरुंग लागणार?



### मुंबईतील पक्षीय बलाबल

- ◆भाजप- ८९
- ◆ठाकरे गट- ६५
- ◆शिवसेना- २९
- ◆काँग्रेस- २४
- ◆एमआयएम-८
- ◆मनसे- ६
- ◆राष्ट्रवादी काँग्रेस- ३
- ◆समाजवादी पार्टी- २
- ◆शरद पवार गट-१

# महापालिकेतील महापौरपदाच्या आरक्षणाची सोडत 22 जानेवारीला

प्रतिनिधी २० जानेवारी

**मुंबई :** राज्यातील २९ महानगरपालिकांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान झालं. तर १६ जानेवारी रोजी मतमोजणी झाली. यानंतर आता महापालिकेमधील महापौरपदाच्या आरक्षण सोडतीबाबत एक महत्वाची माहिती समोर आली आहे. यापुर्वी निवडणुकीपुर्वी होणारी सोडत आता निवडणूकीनंतर होणार आहे.

सर्व २९ महानगरपालिकामधील महापौरपदाच्या आरक्षणाची सोडत २२ जानेवारी रोजी काढली जाणार आहे. २२ जानेवारीला सकाळी ११ वाजता सर्व महापालिकांसाठी महापौरपदाची आरक्षण सोडत काढली जाणार आहे. त्यामुळे कोणत्या प्रवर्गाचा महापौर कोणत्या नगरपालिकेमध्ये बसणार हे २२ जानेवारीला निश्चित होईल. नगरविकास विभागाकडून महापौरपदाच्या आरक्षणाची सोडत मंत्रालयात काढली जाईल.महापौर आरक्षणाची रोटेशन पद्धत बदलण्याबाबत चर्चा सुरु असल्याची माहिती समोर आली आहे. पुन्हा ओपनपासून सुरुवात करत आरक्षण सोडतीच्या चक्राकार पद्धतीनं महापौर आरक्षणाची सोडत निघण्याची शक्यता आहे. महापौरपदाचे आरक्षण चक्राकार पद्धतीने निश्चित करण्यात येते. समाजातील सर्व घटकांना महापौर पदाची संधी मिळावी, यासाठी चक्राकार पद्धतीने आरक्षणाची सोडत काढण्यात येते. सध्या कायद्यात एससी, एसटी, महिला आणि ओबीसींसाठी रोटेशनने आरक्षण आहे. मात्र, नियमातील नव्या बदलानुसार चक्राकार पद्धत नव्यानं सुरु केली जाऊ शकते.



# शिवी दिली म्हणजे गुन्हा नाही !

■ एससी/एसटी कायद्यावर सर्वोच्च न्यायालयाचा खुलासा

प्रतिनिधी २० जानेवारी

**मुंबई :** अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा, १९८९ च्या व्याख्येत महत्त्वपूर्ण स्पष्टीकरण देताना, सर्वोच्च न्यायालयाने एका प्रकरणात स्पष्ट केले की, एखाद्या व्यक्तीने अपमानजनक शब्द वापरले तरी ते सरसकट गुन्हा ठरत नाही. यासाठी त्या शब्दांचा उद्देश तक्रारदाराच्या जाती किंवा जमातीच्या सदस्यत्वावर आधारित अपमान करणे हा असावा. हा निकाल न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या द्विसदस्यीय खंडपीठाने गेल्या आठवड्यात दिला.

या प्रकरणाची सुरुवात बिहारमधील एका घटनेपासून झाली. अपीलकर्ता केशव महातो, ज्याला केशव कुमार महातो म्हणूनही ओळखले जाते, याने पाटणा उच्च न्यायालयाच्या एका निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. १५ फेब्रुवारी २०२५ रोजी पाटणा उच्च न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाच्या समन्स आदेशात हस्तक्षेप करण्यास नकार दिला होता. या प्रकरणात, एका अंगणवाडी केंद्रात घडलेल्या घटनेच्या पार्श्वभूमीवर, अपीलकर्त्यावर जाती-आधारित गैरवर्तन आणि हल्ल्याचा आरोप ठेवण्यात आला होता. त्यावरून दाखल करण्यात आलेल्या एफआयआरच्या आधारावर फौजदारी कार्यवाही सुरू करण्यात आली. मात्र, अपीलकर्त्याने ही कार्यवाही रद्द करण्याची मागणी केली, आणि उच्च न्यायालयाने ती फेटाळली.

### विविध कलमांचा सखोल अभ्यास

सर्वोच्च न्यायालयाने या याचिकेवर सुनावणी घेताना कायद्याच्या विविध कलमांचा सखोल अभ्यास केला. खंडपीठाने निरीक्षण नोंदवले की, कनिष्ठ न्यायालय आणि उच्च न्यायालय दोन्ही ठिकाणी अनुसूचित जाती/जमाती कायद्याच्या अंमलबजावणीत त्रुटी झाली आहे. विशेषतः, एफआयआर किंवा आरोपपत्रात अपीलकर्त्याने तक्रारदाराच्या जातीवर आधारित अपमान किंवा धमकी दिल्याचा कोणताही ठोस आरोप नव्हता. यामुळे, केवळ अपमानजनक भाषेच्या वापरावरून गुन्हा सिद्ध होत नाही, असा मुद्दा पुढे आला.

### तरच तो दंडनीय गुन्हा

कायद्याच्या कलम ३(१) च्या तरतुदींचा उल्लेख करताना, न्यायालयाने सांगितले की, अनुसूचित जाती किंवा जमातीचा सदस्य नसलेल्या व्यक्तीने सार्वजनिक ठिकाणी एखाद्या सदस्याला जाणीवपूर्वक अपमानित करण्यासाठी किंवा धमकावण्यासाठी अपमानजनक शब्द वापरले तरच तो दंडनीय गुन्हा ठरतो. उदाहरणार्थ, सार्वजनिक स्थळी जातीचे नाव घेऊन शिवीगाळ करणे किंवा अपमान करणे हे या कायद्याअंतर्गत येते. पण, यासाठी अपमानाचा मुख्य उद्देश त्या व्यक्तीच्या जातीशी संबंधित असावा लागतो. न्यायालयाने मागील निकालांचा संदर्भ देत हे स्पष्ट केले की, कलम ३(१)(आर) अंतर्गत गुन्हा सिद्ध करण्यासाठी दोन मुख्य अटी पूर्ण होणे गरजेचे आहे. पहिली अट ही की, तक्रारदार अनुसूचित जाती किंवा जमातीचा सदस्य असावा. दुसरी अट ही की, केलेला अपमान किंवा धमकी ही तक्रारदाराच्या जाती किंवा जमातीच्या सदस्यत्वामुळे असावी.

# शिंदेसेना भाजपमध्ये विलीन होईल – प्रसिद्ध वकील असीम सरोदे

प्रतिनिधी २० जानेवारी

**मुंबई :** शिवसेना पक्षाचे नाव आणि चिन्हाबाबत उद्या २१ जानेवारीला सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडणार आहे. या सुनावनीकडे अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष लागलेले आहे. २०२२ मध्ये शिवसेनेत फूट पडल्यानंतर निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे गटाला पक्षाचे अधिकृत नाव 'शिवसेना' आणि 'धनुष्यबाण' चिन्ह बहाल केले होते. या निर्णयाला उद्धव ठाकरे गट यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.

आता या प्रकारणीची सुनावणी २१ जानेवारीला सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जोयमलया बागची यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठासमोर पार पडणार आहे. उद्याच्या सुनावणी अगोदर प्रसिद्ध वकील असीम सरोदे यांनी एक्सवरून ट्वीट शेअर करत मोठा दावा केला आहे. शिवसेना नाव आणि धनुष्यबाण हे पक्षचिन्ह. सुनावणीची तारीख उद्या सुप्रीम कोर्टात आहे. पण ३७ नंबरचे मॅटर सुनावणीसाठी होणे कठीण आहे, असे असीम सरोदे यांनी म्हटले आहे.आता लोकांचा नवीन प्रश्न – जर एकनाथ शिंदेंकडून पक्ष चिन्ह व शिवसेना नाव काढून घेतले तर मुंबई महापालिकेत काय होईल? मला वाटते शिंदेसेना भाजपमध्ये विलीन होईल व एकनाथ शिंदे यांचे राजकीय महत्व एकदम कमी होईल, अशी शक्यता असीम सरोदे यांनी व्यक्त केली आहे. त्यांनी केलेल्या या पोस्टमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या पोस्टमध्ये असीम सरोदे यांनी असेही म्हटले आहे की, शिंदेसेनेतील अनेकजण उद्धव ठाकरेंकडे स्वगृही परत जातील व मूळ शिवसेना अधिक ताकदवान होईल. उद्धव आणि राज ठाकरे मिळून मुंबई महापालिकेतील राजकारण फिरवू शकतील. सर्वोच्च न्यायालयातील एका निर्णयामुळे सुरु झालेला खेळ सर्वोच्च न्यायालयाच कधीतरी संपवेल, असेही सरोदे म्हणाले आहेत. २२ जानेवारीला २९ महापालिकांसाठी आरक्षण सोडत जाहीर केले जाणार असून दुसरीकडे २१ तारखेला शिवसेना पक्षाच्या निवडणूक चिन्हाची सुनावणी पार पडणार आहे.

यामुळे अनेक तर्क वितर्क लावले जात आहेत. प्रत्येक गटाला ३ तास युक्तिवाद करण्याची संधी मिळणार आहे. या सुनावणीनंतर लगेचच राष्ट्रवादी काँग्रेसच्या 'घड्याळ' चिन्हावरील वादाचीही सुनावणी होऊ शकते. कारण दोन्ही प्रकरणांत काही समान मुद्दे आहेत.

CMYK CMYK

सिटी न्यूज वऱ्हाड
मंगळवार, दि. २० जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# लाडकी बहीण' योजनेचा घोळ उघड; ३०० महिलांचे पैसे रखडले

## नांदगावच्या महिलांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर ठिय्या, प्रशासनाला जाब

**अमरावती :** नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील तीनशेहून अधिक महिलांना 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचे गेल्या तीन महिन्यांपासून पैसे मिळाले नसल्याने संतप्त महिलांनी सोमवारी अमरावती येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर जोरदार आंदोलन केले. रखडलेल्या लाभाबाबत तात्काळ निर्णय घेण्याची मागणी महिलांनी यावेळी लावून धरली. जिल्हाधिकारी कार्यालयात निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी आंदोलनकर्त्या महिलांचे निवेदन स्वीकारले. या आंदोलनाचे नेतृत्व जिल्हा परिषदेचे माजी सदस्य प्रकाश सावळे यांनी केले. चौकशीत केवायसी (ख्म्ण्) प्रक्रियेदरम्यान चुकीची माहिती भरली गेल्यामुळे संबंधित महिलांचे पैसे अडकल्याचे समोर आले आहे. या संदर्भात महिलांनी यापूर्वी महिला व बालविकास विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला होता; मात्र समाधानकारक माहिती न मिळाल्याने अखेर आंदोलनाचा मार्ग अवलंबण्यात आला.

# जिल्हा परिषदेत भत्ते, वाहने आणि इमारतींच्या देखभालीचा तिढा

## ◆ इंधन दरवाढीचा फटका, पदाधिकाऱ्यांची सरकारी वाहनांकडे वाढती मागणी

प्रतिनिधी २० जानेवारी



**अमरावती :** तीन वर्षांपासून पुढे-पुढे सरकत आली आहे. मात्र या कालावधीत इंधन दरात मोठी वाढ झाली असून, त्याचा थेट परिणाम जिल्हा परिषदेच्या कामकाजावर दिसून येत आहे. जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांना वेळोवेळी जिल्हाभर प्रवास करावा लागत असल्याने सरकारी अथवा खासगी वाहनांचा वापर करावा लागतो.

खासगी वाहनांचा वापर केल्यास जिल्हा परिषद प्रशासनातर्फे वेगळा इंधन भत्ता दिला जातो. मात्र हा भत्ता अपुरा ठरत असल्याने बहुतांश पदाधिकारी सरकारी वाहनांचीच मागणी करत असल्याचा अनुभव आहे. परिणामी या वाहनांसाठी लागणारे इंधन तसेच चालकाची सोयदेखील प्रशासनालाच करावी लागत आहे.

दरम्यान, मुख्यालयातील पदाधिकाऱ्यांच्या दालनांचे दुरुस्तीकार्य सुरू करण्यात आले आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि विषय समित्यांचे सभापती असे एकूण सहा पदाधिकारी आहेत. अध्यक्ष हे आमसभेचे अध्यक्ष असून त्यांच्याकडे स्थायी समिती व जल व्यवस्थापन समितीची पदसिद्ध सभापतीपदाची जबाबदारी असते. उपाध्यक्षांकडे दोन समित्यांचे सभापतीपदाचे कामकाज सोपविले जाते.

याशिवाय महिला व बालविकास तसेच समाजकल्याण समितीला दोन स्वतंत्र सभापती असतात. उर्वरित दोन सभापतींकडे शिक्षण, आरोग्य, वित्त व बांधकाम यापैकी प्रत्येकी दोन-दोन खात्यांची जबाबदारी दिली जाते. या सर्व पदाधिकाऱ्यांच्या निवासस्थानांची व कार्यालयांची सोय प्रशासनातर्फे करण्यात आलेली आहे.

त्यामुळे या इमारतींची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारीही शासनातर्फे दरवेळी केली जाते. ही अनिश्चित व्यवस्था असल्याने पदाधिकाऱ्यांच्या निवासस्थानांची आणि दालनांच्या दुरुस्तीची जबाबदारी पुन्हा-पुन्हा प्रशासनावर येत असल्याचे चित्र आहे.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे - मराठी साहित्यातील अष्टपैलू 'महामेरू' - सुधीर सरकटे

प्रतिनिधी २० जानेवारी




**अमरावती:** मराठी साहित्याचा विचार करताना ज्याचे नाव अत्यंत आदराने आणि अभिमानाने घेतले जाते ते व्यक्तिमत्त्व म्हणजे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे. केवळ उपेक्षित समाजाचे दुःख मांडणारे लेखक न राहता त्यांनी आपल्या लेखनातून क्रांतीची मशाल पेटवली आज त्यांच्या साहित्याचा आवाका पाहता ते मराठी साहित्यातील खऱ्या अर्थाने 'महामेरू' ठरतात. आज २०२६ मध्ये ही अण्णाभाऊंचे साहित्य तितकेच प्रेरणादायी ठरत आहे त्यांच्या कथा मधील नायक हा संघर्षातून उभा राहणारा आणि अन्यायाविरुद्ध लढणारा असतो साहित्यातून वास्तववाद मांडतांना त्यांनी मानवी मूल्यांची जपणूक केली दलित, कष्टकरी, आणि शेतकरी यांच्या व्यथांना जागतिक व्यासपीठ मिळवून देण्याचे काम या महामेरूने केले फकीरा सारखी त्यांची कादंबरी मराठी साहित्यातील मैलाचा दगड ठरली अण्णाभाऊंच्या साहित्यात केवळ कल्पनाशक्ती नव्हती, तर शोषितांचा संघर्ष होता असे मत सुधीर सरकटे यांनी यावेळी उपस्थित वधू वर व पालक यांना संबोधित करतांना सांगीतले

संबधीत मेळाव्याचे आयोजन मातंग विचार मंच अकोला यांच्या वतीने वधु वर मेळाव्याचे आयोजन दि.१८ जानेवारी २०२५ ला जि.प. कर्मचारी कल्याण भवन अकोला येथे करण्यात आले असुन या मेळावा कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ, कविता आकोडे, ललित अंभोरे, प्रशांत तऊर, नीलकमल गायकवाड, वैशाली कोटंबे, रोहिणी भालेराव, महादेव खंडारे, निशा अंभोरे, प्रविण धुमाळ व मातंग विचार मंचचे समस्त सदस्य युवक, युवती, समाज बांधव व इत्यादी समाज बांधव या वधु वर मेळाव्याला उपस्थित होते.

# जिजाऊ व विवेकानंद जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धेला प्रतिसाद

प्रतिनिधी २० जानेवारी




**मोर्शी :** राष्ट्रमाता, राजमाता जिजाऊ व युगप्रवर्तक स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त स्थानिक श्री. आर. आर. लाहोटी विज्ञान महाविद्यालयात वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. एन. चौधरी हे होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रा. अरविंद मंगळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास प्रा. डॉ. गजानन हरडे, प्रा. डॉ. राहुल बेहेरे, प्रा. विनोद सावरकर, डॉ. दिपाली चिखले आदी मान्यवर उपस्थित होते. वकृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांनी राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवनकार्यावर, विचारधारेवर आणि समाजघडणीतल्या योगदानावर प्रभावीपणे प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण केले. प्रमुख अतिथी प्रा. अरविंद मंगळे यांनी विद्यार्थ्यांनी अशा स्पर्धांच्या माध्यमातून स्वतःला ओळखावे, धाडसाने पुढे येत व्यक्तिमत्त्व विकास साधावा, असे मार्गदर्शन केले. प्रा. गजानन हरडे व प्रा. राहुल बेहेरे यांनीही विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी प्रेरणादायी विचार मांडले. स्पर्धेचे परीक्षण प्रा. डॉ. अश्विन लुंगे व प्रा. सरिता अविनाशे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दिपाली चिखले यांनी केले, सूत्रसंचालन प्रा. पायल कडू यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. स्वाती फुसाम यांनी केले. कार्यक्रमास वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महागाईची कात्री : शहरात भाजीपाला महाग, शेतकऱ्याच्या पदरी मात्र तोटाच

**अमरावती :** शहरातील भाजीपाला बाजारात गेल्या काही दिवसांपासून दरवाढीने उच्चांक गाठला असून, याचा थेट फटका सामान्य महिलांच्या घरगुती बजेटला बसत आहे. टोमॅटो, कांदा, बटाटा, हिरवी भाजी यांचे दर गगनाला भिडले असताना, दुसरीकडे शेतकऱ्यांच्या मालाला मात्र अत्यल्प दर मिळत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. ग्राहक आणि उत्पादक दोघेही अडचणीत असतानाही मध्यस्थ मात्र फायद्यात असल्याचे चित्र दिसून येत आहे.

शहरातील भाजी बाजारात रोजच्या वापरातील भाजीपाल्याचे दर सामान्यांच्या आवाक्याबाहेर गेले आहेत. एका कुटुंबाचा रोजचा स्वयंपाक सांभाळताना गृहिणींना मोठी कसरत करावी लागत आहे. महिन्याच्या सुरुवातीलाच भाजीपाला खर्च वाढल्याने घरगुती अर्थसंकल्प कोलमडत असून, अनेकांना भाजीपाला खरेदी कमी करावी लागत आहे.

दरम्यान, याच भाजीपाल्याची शेतातून विक्री होताना मात्र शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही निघत नसल्याची तक्रार आहे. बाजार समितीत शेतकऱ्यांच्या मालाला अत्यल्प दर मिळत असल्याने तोटा सहन करण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे. वाहतूक, मजुरी, बियाणे व खतांचा खर्च वाढलेला असतानाही योग्य भाव न मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे.

# बाबा सिद्दीकींचीच सारखी धमकी; नवनीत राणा पुन्हा लक्ष्य!

## ◆ फोनवरून जीवे मारण्याची धमकी, अमरावतीत राजकीय वर्तुळात खळबळ

प्रतिनिधी २० जानेवारी



**अमरावती :** भाजप नेत्या व माजी खासदार नवनीत राणा यांना पुन्हा एकदा जीवे मारण्याची धमकी मिळाल्याने अमरावती जिल्ह्यात राजकीय खळबळ उडाली आहे. बाबा सिद्दीकी यांची हत्या केल्यासारखीच तुमची हत्या करू, अशी थेट धमकी अज्ञात व्यक्तीने फोनवरून दिल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी राजापेठ पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांच्या ११२ क्रमांकावर फोन करून नवनीत राणा यांना ठार मारण्याची धमकी देण्यात आली. मुलींच्या जन्मासंदर्भात केलेल्या वक्तव्यावरून यापूर्वीही त्यांच्यावर टीका झाली होती. त्या मुद्द्यावरून ओवेसी समर्थकांकडून त्यांना लक्ष्य करण्यात आले होते. त्यानंतर आता थेट जीवे मारण्याची धमकी मिळाल्याने गंभीर वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, यापूर्वीही हैदराबाद येथील अब्दुल नावाच्या व्यक्तीने नवनीत राणा यांना घाणेरड्या शब्दांत पत्राद्वारे धमकी दिली होती. ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात धमकीची दोन पत्रे प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या खासगी स्वीय सहाय्यकाच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता.

हिंदू शेरणी आणि निवडणूक प्रचारादरम्यान हैदराबादमधील भाषणानंतरही नवनीत राणा यांना धमक्या आल्याचे प्रकार घडले होते. आता पुन्हा फोनवरून धमकी दिल्याने अमरावतीसह राज्याच्या राजकीय वर्तुळात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

नुकत्याच पार पडलेल्या महापालिका निवडणुकीत अमरावतीत भाजप व आमदार रवी राणा यांच्या पक्षाला मोठे यश मिळाले आहे. या पार्श्वभूमीवर धमकीचा प्रकार घडल्याने सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करून कॉलचे तांत्रिक विश्लेषण सुरू केले असून पुढील तपास वेगाने सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे.

# शिरजगाव कसब्यात ६४ लाखांचा प्रतिबंधित गुटखा जप्त

## ◆ अन्न व औषध प्रशासन-पोलीसांची संयुक्त कारवाई; एकास अटक, मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश

प्रतिनिधी २० जानेवारी



**अमरावती :** महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटखा व सुगंधित तंबाखूच्या अवैध साठा व विक्रीविरोधात शिरजगाव कासबा पोलीस स्टेशन हद्दीत मोठी कारवाई करण्यात आली. अन्न व औषध प्रशासन व पोलिसांच्या संयुक्त पथकाने केलेल्या छाप्यात सुमारे ६४ लाख ७२ हजार रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा, तंबाखू व मुद्देमाल जप्त करण्यात आला असून इस्माईल मोहम्मद फारुख (वय ३७, रा. अंजनगाव सुर्जी) याला अटक करण्यात आली आहे.

दिनांक १६ जानेवारी २०२६ रोजी मध्यप्रदेश राज्यातून अवैधरित्या गुटखा वाहतूक होणार असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. छाप्यात विविध कंपन्यांचे प्रतिबंधित गुटखा, पानमसाला, सुगंधित तंबाखू तसेच वाहतुकीसाठी वापरण्यात आलेले वाहन जप्त करण्यात आले. जप्त केलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत अंदाजे ६४.७२ लाख रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

या प्रकरणी शिरजगाव कासबा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा क्रमांक २३/२०२६ नोंदविण्यात आला असून आरोपीविरुद्ध अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६, तंबाखू नियंत्रण कायदा तसेच संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी हा प्रतिबंधित गुटख्याची विक्री व वितरण करत असल्याचे प्राथमिक तपासात उघड झाले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अमरावती ग्रामीण श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक श्री. पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत अन्न व औषध प्रशासनातील अधिकारी व शिरजगाव कासबा पोलीस स्टेशनच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सहभाग होता. पुढील तपास सुरू असून या रॅकेटमागील इतर आरोपींचा शोध पोलीस घेत आहेत.

# पोलीस मुख्यालय मैदानावर प्रजासत्ताक दिनाचा मुख्य शासकीय सोहळा

**अमरावती :** भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनाचा मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा यावर्षी पोलीस मुख्यालय, अमरावती शहर परेड मैदान येथे आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम २६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९.१५ वाजता पार पडणार आहे. दरवर्षी प्रजासत्ताक दिनाचा मुख्य सोहळा अमरावती येथील जवाहरलाल नेहरू स्टेडियम येथे साजरा केला जातो. मात्र, या स्टेडियमवर ४०० मीटर रनिंग ट्रॅकचे काम सुरू आहे. या कामामुळे यावर्षी कार्यक्रम घेणे शक्य नसल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे २६ जानेवारी २०२६ चा सोहळा पोलीस मुख्यालय परेड मैदानावर घेण्यात येणार आहे, असे निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी कळविले आहे.

# खामगाव नगरपालिका स्थायी व विषय समिती निवडणुकीत भाजपचाच दबदबा !

## बांधकाम सभापती सतिषआप्पा दुडे, पाणी पुरवठा प्रशांत नायसे तर आरोग्य सभापती प्रविण कदम यांच्यासह सर्व सभापती अविरोध



प्रतिनिधी २० जानेवारी

**खामगाव :** खामगाव नगरपालिकेतील स्थायी व विषय समितीच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने दबदबा कायम ठेवला आहे. सोमवारी दुपारी नगर पालिका सभागृहात झालेल्या निवडणुकीत स्थायी समिती तसेच विविध विषय समित्यांवर भाजपच्या नगरसेवकांनी अविरोध विजय मिळवला. यासह खामगाव नगरपालिकेत भाजपच्या दबदब्यामुळे स्थायी व विषय समितीवर स्पष्ट नियंत्रण झाले आहे. यावेळी नगराध्यक्ष अपर्णा सागर फुंडकर आणि सर्व नगरसेवक उपस्थित होते. सभापतींची निवड झाल्यानंतर पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जल्लोष केला.सतिषआप्पा दुडे (बांधकाम सभापती),प्रविण कदम (आरोग्य सभापती) सौ. स्नेहल गरड (शिक्षण सभापती),प्रशांत नायसे (पाणी पुरवठा सभापती), सौ. ज्योती भुसारी (महिला व बालकल्याण सभापती), फातेमाबी मो. नईम (महिला व बालकल्याण उपसभापती) अविरोध विजय मिळवला.

### स्थायी समितीची रचना

स्थायी समितीमध्ये एकूण १० सदस्य आहेत. यामध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष, पाच सभापती आणि तीन सदस्यांचा समावेश आहे. नगराध्यक्ष या स्थायी समितीच्या सभापती राहतील. समितीच्या निवडीसाठी विशेष लक्ष बांधकाम, आरोग्य, पाणीपुरवठा, शिक्षण या विभागांवर देण्यात आले. महिला व बालकल्याण समितीसाठी सभापती व उपसभापतीची निवड झाली.

### विषय समितीची रचना

प्रत्येक विषय समितीत सभापतीसह एकूण ९ सदस्य आहेत. सत्ताधारी पक्षाचे ७ सदस्य समितीत आहेत, तर विरोधी पक्षाकडून ०२ सदस्याची नियुक्ती करण्यात आली आहे.पिठासीन अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी डॉ. रामेश्वर पुरी, मुख्याधिकारी डॉ. प्रशांत शेळके आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट

## खामगाव

# अद्ययावत आयसीयूमुळे नागरिकांना दिलासा

## ◆कामगार मंत्री फुंडकर यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी २० जानेवारी



**खामगांव:** खामगाव शहरात रात्रीच्या वेळी - अत्यावश्यक रुग्णांवर उपचार - करण्यासाठी अडचणी येत होत्या. त्यामुळे - अकोला रेफर ही खामगावची ओळख झाली होती.

मागील दहा वर्षापासून सिल्व्हर सिटी हॉस्पिटलच्या माध्यमातून रुग्णांना अविरत सेवा मिळत आहे. आंतरराष्ट्रीय मानांकनानुसार सिल्व्हर सिटी हॉस्पिटलमध्ये सर्व अत्याधुनिक सुविधांसह नवीन आयसीयूमुळे परिसरातील नागरिकांना दिलासा मिळणार आहे असे प्रतिपादन कामगार मंत्री अड. आकाश फुंडकर यांनी केले. येथील सिल्वरसिटी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल च्या अत्याधुनिक सुविधायुक्त नूतन आयसीयू चे उद्घाटन १७ जानेवारी रोजी राज्याचे कामगार मंत्री अड. आकाश फुंडकर यांच्या हस्ते पार पडले. यावेळी नगर परिषदेच्या नगराध्यक्ष अपर्णा सागर फुंडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. खामगाव शहरात अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा व उपचार जनतेस उपलब्ध करून देण्यासाठी सिल्वरसिटी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल क्रिटिकल केअर व ट्रामा सेंटर कार्यरत आहे. सिल्व्हर सिटी हॉस्पिटल तर्फे उभारण्यात आलेल्या अध्यायावरचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक हॉस्पिटलचे अध्यक्ष डॉ. अशोक बावस्कर यांनी, संचालन डॉ. गौरव गोयनका, तर आभार व्यवस्थापकीय संचालक डॉ. पंकज मंत्री यांनी मानले.

# भैय्यासाहेबांसारखे अजातशत्रू व्यक्तिमत्व राजकारणात विरळेच - हर्षवर्धन सपकाळ

## ◆ भैय्यासाहेब देशमुख यांचा अमृतमहोत्सव उत्साहात साजरा

प्रतिनिधी २० जानेवारी




**देऊळगाव साकरशा :** भैय्यासाहेब देशमुख यांच्यासारखे निःस्पृह, संयमी, अजातशत्रू व्यक्तिमत्व राजकीय क्षेत्रात विरळा आहेत. सध्या राजकीय वातावरण बदलले असून, समाजात एकूणच राजकीय चारित्र्याची पुनर्बांधणी आवश्यक आहे, असे प्रतिपादन काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी येथे केले.

ज्येष्ठ नेते भैय्यासाहेब देशमुख यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त सोहळा देऊळगाव साकरशा येथे झाला, त्यावेळी ते बोलत होते. दत्तात्रय पाचपवार गुरुजी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. माजी खासदार अनंतराव देशमुख, माजी आमदार संजय रायमुलकर, काँग्रेस नेते श्याम उमाळकर यांच्यासह सर्वपक्षीय नेते, अनेक मान्यवर उपस्थित होते.

श्री. सपकाळ म्हणाले की, भैय्यासाहेबांचे समाजासाठी मोठे योगदान असून, राजकारणातही त्यांची प्रगल्भ, विवेकी भूमिका राहिली. त्यांच्या सर्वमान्य नेतृत्वामुळे आशाताई जिल्हा परिषदेत बिनविरोध निवडून आल्या. आज अशी व्यक्तिमत्व राजकारणात दुर्मिळ आहेत.

श्री. रायमुलकर म्हणाले की, भैय्यासाहेबांनी कुणाविषयीही कटुता न बाळगता सर्वांशी जिव्हाळा जपला. त्यांचे नेतृत्व पक्षातीत राहिले. श्री. उमाळकर म्हणाले की, भैय्यासाहेबांनी नागरिकांच्या हिताची अनेक कामे केली. उतावळी नदीला महापूरावेळी त्यांनी तत्काळ लक्ष वेधल्याने मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचा दौरा होऊन आपदग्रस्ताना वेळेत मदत मिळू शकली.

यावेळी श्री. देशमुख यांची ग्रंथतुला, विनामूल्य अभ्यासिका भूमीपूजन व ७५ वृक्ष लागवड करण्यात आली. गजानन तात्या कृपाळ, चांद शेख यांनीही मनोगत व्यक्त केले. मेहकरचे नगराध्यक्ष किशोर गारोळे, माजी नगराध्यक्ष कासम गवळी, काँग्रेस उपाध्यक्ष लक्ष्मणराव घुमरे, राष्ट्रवादी काँग्रेस उपाध्यक्ष अलीमभाई ताहेर, अनंतराव वानखेडे, माजी कृषी सभापती केशवराव जागृत, गजानन तात्या कृपाळ, श्रीकृष्ण देवकर, ॲड. सुरेश वानखेडे, महाबीजचे संचालक वल्लभराव देशमुख, संपतराव बापू देशमुख, जानेफळचे सरपंच गजाननराव वडनकर, मोहनजी धोटे, मेहकर तालुका शिवसेना प्रमुख सुरेश तात्या वाळूकर, शिवसेना (उबाठा) तालुका प्रमुख लिंबाजी पांडव, काँग्रेस तालुका अध्यक्ष प्रदीप देशमुख, नंदूभाऊ बोरे, वसंतराव देशमुख, डिगांबर मवाळ, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष भास्करराव ठाकरे, चित्रांगण खंडारे, प्रमोद देशमुख, राहुल देशमुख, संतोषराव नरवाडे, देवानंद पवार, डॉ. शेषरावजी ब्रदर, डॉ. हेमराज राठी, डॉ. भरत आल्हाट, विनायक टाले, शैलेश सावजी, सुधाकरराव धाबे, विष्णूजी पाखरे, अभिमन्यू नवले, केशवराव फुके, संतोषराव तोंडे, संदिप क-हाळे, सोशल मीडिया काँग्रेस अध्यक्ष संदिप ढोरे, रूपेश ढोरे यांच्यासह तालुक्यातील विविध समाजांतील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सिटी न्यूज अकोला

मंगळवार, दि. २० जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# अकोल्यात उद्यापासून वैशिष्ट्यपूर्ण कला महोत्सव

प्रतिनिधी २० जानेवारी

**अकोला :** सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने प्रमिलाताई ओक हॉल, अकोला या ठिकाणी दि. २१आणि २२जानेवारी २०२६ रोजी साय ६:३० वा. सांस्कृतिक कार्यक्रम वैशिष्ट्यपूर्ण कला महोत्सवचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार दिनांक २१ रोजी सायंकाळी ६:३० वाजता प्रसिद्ध बंजारा नृत्य सादर होणार असून सादरकर्ता कला संघ हा बार्शीटाकळी तालुक्यातील साखरविरा या गावातील ललिता जाधव आणि कलावंत सादर करणार आहेत. गुरुवार दि. २२ जानेवारी रोजी सायंकाळी ६:३० वाजता.महाराष्ट्रची लोककला वासुदेव , गौधळ, भारुड कलापथक खंडीगमत इत्यादी लोककलेचे प्रकार होणार आहेत. सादरकर्ते - शाहिर विशाल ना.राखोंडे व लोककवी सागर राखोंडे संच, साने गुरुजी कला व सांस्कृतिक क्रीडा बहु.मंडळ, पातुर व स्व.विनायक राखोंडे प्रतिष्ठान, पातुर या कार्यक्रमात एकूण १५ कलावंत सहभागी होणार आहे.

## प्रजासत्ताक दिन समारंभाच्या पूर्वतयारीचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा



प्रतिनिधी २० जानेवारी

**अकोला:** प्रजासत्ताक दिनाचा मुख्य शासकीय समारंभ लालबहादूर शास्त्री क्रीडांगणावर होणार असून, त्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे दिले.

प्रजासत्ताक दिन सोहळ्याच्या पूर्वतयारीचा आढावा जिल्हाधिका-यांनी घेतला, त्यावेळी त्या बोलत होत्या. उपविभागीय अधिकारी डॉ. शरद जावळे, निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्रीमती मीना म्हणाल्या की, प्रजासत्ताक दिन समारंभात ध्वजवंदन, पथसंचलन, कवायती, सांस्कृतिक कार्यक्रम आदी विविध कार्यक्रम होणार आहेत. त्यादृष्टीने परिपूर्ण नियोजन करावे, तसेच संचलन, कवायतीच्या दृष्टीने आवश्यक सराव करावा. परिसराची स्वच्छता, पेयजल, अग्निशमन यंत्रणा, तसेच रूग्णवाहिका आदी सर्व जबाबदा-या संबंधित यंत्रणांनी चोखपणे पार पाडण्याचे निर्देश त्यांनी दिले. प्रजासत्ताक दिनाचा मुख्य शासकीय समारंभात पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या हस्ते ध्वजारोहण लालबहादूर शास्त्री क्रीडांगणावर दि. २६ जानेवारीला सकाळी ९.१५ वा. होईल.

# धर्मवीर संभाजी मंडळात राज्याभिषेकाचा गौरवशाली सोहळा व बजरंग दलाची स्थापना

प्रतिनिधी २० जानेवारी

**तेल्हारा:** धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाचा गौरवशाली सोहळा तेल्हारा येथिल धर्मवीर संभाजी मंडळाच्या वतीने अत्यंत उत्साहात झाला. या सोहळ्याने परिसरात स्वराज्याची ज्वाला पुन्हा एकदा प्रज्वलित केली या वेळी संभाजी चौकामध्ये बजरंग दलाची स्थापना करून कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली.

शिवव्याख्याते सौरभ वाघोडे यांनी धर्मवीर संभाजी महाराजांच्या अद्वितीय शौर्यगाथेचा उलगडा करताना उपस्थितांच्या अंगावर शहारे आणले. 'संभाजी महाराज म्हणजे केवळ रणधुरंधर योद्धा नव्हे, तर धर्म, स्वराज्य आणि स्वाभिमानासाठी मृत्यूलाही न घाबरणारा तेजस्वी राष्ट्रपुरुष,' असे ठाम प्रतिपादन त्यांनी केले.

मुघलांच्या अमानुष छळासमोरही न झुकणारे संभाजी महाराज, त्यांची स्वराज्यनिष्ठा,



बौद्धिक प्रगल्भता, पराक्रमी नेतृत्व आणि बलिदानाची पराकाष्ठा आजच्या पिढीसाठी दिशादर्शक आहे, असे सांगताना वाघोडे यांनी इतिहासातील अनेक थर उलगडले. त्यांच्या ओघवत्या शैलीतील भाषणाला उपस्थित शिवप्रेमींनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली . विश्व हिंदू परिषद बजरंग दलाचे कार्य काय सेवा सुरक्षा संस्कार या विषयावर विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा सह संयोजक राहुल श्रुगारकर यांनी सविस्तर माहिती दिली आकाश पिवाल व रुतिक मानकर यांनी सुद्धा आपले विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे ज्येष्ठ नागरिक ओंकारराव फाटकर होते तर प्रमुख अतिथी म्हणून विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा सहसंयोजक श्रुंगारकर सर बजरंग दलाचे जिल्हा सहसंयोजक निलेश खेट्टे तसेच रघुनाथराव सोनटक्के कैलास खारोडे विश्वनाथ आप्पा घोडेस्वार आकाश पिवाल बजरंग दलाचे माजी तालुका अध्यक्ष रामभाऊ फाटकर सामाजिक कार्यकर्ते मंगेश ठाकरे पंकज कांगटे निर्मळ रवी राऊत विशाल गावत्रे आदी मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन आकाश फाटकर यांनी केले.

**बजरंग दलाची कार्यकारणी घोषित..**

धर्मवीर संभाजी मंडळा मध्ये धर्मविर संभाजी महाराज राज्याभिषेक सोहळयाचे औचित्य साधून बजरंग दलाची स्थापना करण्यात आली व कार्यकारणी घोषित करण्यात आली शाखा संयोजक म्हणून कुशल सोनटक्के सहसंयोजक श्याम कोळंबे ,प्रथमेश मामनकार गौरक्षा प्रमुख अभिजित लासुरकार विद्यार्थी प्रमुख मोहित बाभुळकर सुरक्षा प्रमुख, मनिश मोहोड आखाडा प्रमुख, वैभव मानकर सत्संग प्रमुख रोहन ठाकूर सदस्य लखन मामनकार विक्की खारोडे चेतन घुले शिवम घोडेस्वार नंदु गव्हाळे, प्रज्वल फाटकर दिपक जउळकार ओम घोडेस्वार यांची नियुक्ती करण्यात आली.

# नवनिर्वाचीत गटनेता गजानन नाकट यांचा भाजप कार्यालयात सत्कार



प्रतिनिधी २० जानेवारी

**मुर्तिजापूर:** शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटीबद्ध असुन केंद्र, राज्य शासनाकडून भरीव निधी खेचून आणत मुर्तिजापूर शहराच्या विकासावर भर देणार असल्याची ग्वाही आमदार हरिष पिंपळे यांनी दिली. मुर्तिजापूर नगरपरिषद मध्ये मागील पंधरा वर्षापासून लोकप्रतिनिधींची भूमिका घेणारे भाजप व सहकारी पक्ष नगरसेवक गटाच्या गटनेता पदी निवड झाल्याबद्दल गजानन नाकट यांचा आज आमदार हरिष पिंपळे यांनी लक्कडगंज येथील जनसंपर्क कार्यालयात सत्कार केला. गजानन नाकट यांच्या संघटनात्मक कौशल्याचा आणि कार्याचा हा यथोचित गौरव आहे. त्यांच्या नेतृत्वात शहराच्या विकासाला अधिक गती मिळेल, असा विश्वास यानिमित्ताने आमदार पिंपळे यांनी व्यक्त केला. भारतीय जनता पार्टीमध्ये अनेक वर्षापासून गजानन नाकट एक महत्त्वपूर्ण भूमिका प्रत्येक निवडणुकीमध्ये घेत आहे पक्षाचा विश्वास त्यांच्यावर खूप असून ते नेहमी पक्षाला बळकट करण्यासाठी आपल्या प्रभागात काम करत आहे

याप्रसंगी नगराध्यक्ष हर्षल साबळे व भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अशी माहिती कोमल तायडे यांनी कळविली.

# उमरा सर्कलमधील शेतकऱ्यांचे महावितरणविरोधात निवेदन

## ◆ दिवसा वीजपुरवठा व अधिकाऱ्यांच्या बदलीची मागणी

वि. प्रतिनिधी २० जानेवारी

**अकोट :** उमरा सर्कलमधील शेतकऱ्यांना शेतातील वीज दिवसा देण्यात यावी, तसेच गावातील सतत होणारी वीज खंडितता तात्काळ थांबवावी, या मागण्यांसाठी शेतकरी व नागरिकांनी महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन दिले.

निवेदनात शेतकऱ्यांनी नमूद केले की, उमरा सर्कलमध्ये वन्य प्राण्यांच्या हल्ल्याच्या घटना वारंवार घडत असून, अशा परिस्थितीत रात्री शेतात जाऊन पाणी देणे जीवघेणे ठरत आहे. त्यामुळे दिवसा वीजपुरवठा अत्यावश्यक आहे. तसेच गावातील वारंवार वीज खंडित होत असल्यामुळे शेतकरी व नागरिक मोठ्या प्रमाणावर त्रस्त झाले आहेत.

याशिवाय, संबंधित अभियंता शेतकऱ्यांशी अर्वाच्य, अपमानास्पद व धमकीच्या भाषेत बोलत असल्याचा आरोप करण्यात



आला आहे. 'तक्रार केली तरी काही फरक पडत नाही' अशा प्रकारची विधाने करून शेतकऱ्यांवर दबाव टाकला जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यामुळे उमरा महावितरण कार्यालयाबाबत नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

शेतकऱ्यांनी पुढील मागण्या केल्या आहेत : उमरा सर्कलमधील शेतातील वीज दिवसा देण्यात यावी. गावातील सतत होणारी वीज खंडितता तात्काळ थांबवावी. शेतकऱ्यांशी अर्वाच्य भाषेत वागणाऱ्या संबंधित अभियंत्याची तात्काळ बदली करण्यात यावी. शेतकरी व नागरिकांना न्याय देण्यात यावा. मागण्यांकडे तात्काळ लक्ष न दिल्यास महावितरण कंपनीविरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. तसेच भविष्यात वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात कोणत्याही शेतकऱ्याच्या जीवितास हानी झाल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित अधिकारी व महावितरण कंपनीची राहील, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. हे निवेदन आमदार प्रकाश भारसाकळे यांनाही देण्यात आले. यावेळी सुभाष सुरतने, ऋषिकेश लोणकर, किशोर बोंद्रे,

# मनपा आयुक्त डॉ.लहाने यांनी घेतली टॅक्स वसुलीबाबत आढावा बैठक



प्रतिनिधी २० जानेवारी

**अकोला:** १९ जानेवारी २०२६ रोजी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनिल लहाने यांच्याद्वारे अकोला महानगरपाकेच्या डॉ.बाबासाहेब मुख्य सभागृह येथे मालमत्ता कर विभागाची कर वसुली बाबत आढावा बैठक घेतली.

या बैठकीत सर्वप्रथम मनपा आयुक्त यांनी आजपर्यंत करण्यात आलेल्या मालमत्ता कर वसुली बाबतचा आढावा घेतला. तसेच यावेळी, जास्त मोठे प्रमाणात थकबाकीदार असलेल्या मालमत्ता धारकांकडे भेटी देऊन थकित कराची वसुली करणे, जे मालमत्ता धारक भेटी देऊनही थकित कराचा भरणा करत नाही अशा मालमत्ता धारकांवर नियामानुसार कार्यवाही करणे, तसेच महानगरपालिकेचा उत्पन्नाच्या दृष्टीने मालमत्ता कर हे मुख्य स्त्रोत असून मनपाच्या उत्पन्नात वाढ व्हावी याकरिता शहरात नवीन बनलेल्या इमारतींवर कर आकारणी करणे आदींबाबत सुचना दिल्या.

तसेच मालमत्ता कर धारकांना कर भरणे अधिक सोईचे व्हावे यासाठी शनिवार आणि आणि रविवार सुटीच्या दिवशीही कार्यालय सुरू ठेवण्यासाठी मनपा आयुक्तांनी यावेळी सूचना दिल्या.

या बैठकीत मनपा अतिरिक्त आयुक्त समेध अलोने, मनपा उपायुक्त विजय पारतवार, दिलीप जाधव, सहा.आयुक्त विठ्ठल देवकते, देविदास निकाळजे, राजेश सरप, गजानन घोंगे, सर्व सहा.कर अधिक्षक आणि कर वसुली लिपिकांची उपस्थिती होती.

## उमेदवारांना निवडणूक खर्चाचा हिशोब ३० दिवसाचे आत सादर करणे बंधनकारक

**अकोला:** अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने निवडणूक काळात उमेदवारांने केलेल्या खर्चाचा हिशोब मा.राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाचे आत अकोला महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय येथील निवडणूक हिशोब खर्च कक्ष येथे सादर करणे अनिवार्य आहे. झोन निहाय/प्रभागनिहाय निवडणूक खर्चाचा हिशोब घेण्याकरिता एकुण ६ पथकांची निर्मिती करण्यात आली आहे. कृपया संबंधीतांनी याची नोंद घेऊन अकोला महानगरपालिका प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन मनपा प्रशासनाव्दारा करण्यात येत आहे.

# मनपा आयुक्त डॉ.लहाने यांनी घेतला स्वच्छता विभागाचा आढावा

प्रतिनिधी २० जानेवारी

**अकोला:** दि. १९ जानेवारी २०२६ रोजी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्याद्वारे अकोला महानगरपाकेच्या डॉ.बाबासाहेब मुख्य सभागृह येथे अकोला महानगरपालिका क्षेत्रात दैनंदिन होणा-या स्वच्छतेच्या कामाचा आढावा.



यावेळी मनपा आयुक्त डॉ.लहाने यांनी, मनपा स्वच्छता विभागाव्दारे शहरात दैनंदिन होणाऱ्या स्वच्छतेच्या कामाबाबत आढावा घेतला. यावेळी मनपा आयुक्त यांनी कचरा घंटा गाडी बाबत नाराजी व्यक्त केली, तसेच सर्व स्वच्छता निरीक्षकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक घरापर्यंत कचरा घंटा गाडी गेलीच पाहिजे याकडे विशेष लक्ष घालून नियोजनपुर्ण काम करणे, शहरातील कचरा संकलनाबाबत लावण्यात आलेले क्यू आर कोड स्कॅनिंग करणे, शहरात डासांचा प्रादुर्भाव वाढण्यासाठी नाल्यांचे साचलेले पणीही जबाबदार असल्याने शहरातील सर्व नालींचे सांडपाणी वाहता करणे, कचरा घंटा गाडी व्यतिरिक्त खुली जागा, नाली, नाले, व वस्तीच्या परिसरात कचरा टाकणा-यांवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी व त्यांना कचरा घंटा गाडी मध्येच ओला व सुका कचरा वेग-वेगळा गोळा करून फक्त कचरा घंटा गाडी मध्येच कचरा टाकणे संदर्भात प्रवृत्त करणे आदी सुचना दिल्या.

तसेच या कामांमध्ये कामचुकारपण केल्यास संबंधीत स्वच्छता निरीक्षकांवर नियमानुसार कार्यवाही करण्यात येणार असल्याबाबत यावेळी सांगितले.

# पर्यावरण रक्षण करा, नाहीतर विनाश अटळ

प्रतिनिधी २० जानेवारी

## ◆ वनराई साहित्य संमेलनात बालकुमारांचा जागृतीपूर्ण परिसंवाद

**अकोला:** येथील श्री. शिवाजी महाविद्यालयाच्या वसंत सभागृहात पार पडलेल्या दुसऱ्या राज्यस्तरीय वनराई बालकुमार साहित्य संमेलनात 'पर्यावरण रक्षण करा, नाहीतर विनाश अटळ..!' या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या बालकुमारांच्या परिसंवादाने उपस्थित रसिक, पालक व साहित्यप्रेमींना विचारप्रवण केले.

या परिसंवादात स्मित सचिन भोयर (स्कूल ऑफ स्कॉलर, अकोला), मृणाली सागर उकर्डे (गुरुकुंज इंग्लिश कॉन्व्हेंट, बोथा काजी, ता. खामगाव) आणि अर्चना ओईम्बे (महात्मा गांधी कनिष्ठ महाविद्यालय, गांधीग्राम), आरुषी भुजाडे (पि. एम. श्री. जि. प. विद्यालय कामरगाव ) या बालवक्त्यांनी सहभाग नोंदवला. वाढती वृक्षतोड, प्रदूषण, पाणीटंचाई, हवामान बदल यांसारख्या गंभीर पर्यावरणीय संकटांवर त्यांनी परखड व अभ्यासपूर्ण विचार मांडले. निसर्गाशी समतोल राखण्याची जबाबदारी मानवाने स्वीकारली नाही,



तर भविष्यात विनाश अटळ आहे, असा इशाराही त्यांनी दिला.

या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी संमेलनाध्यक्षा डॉ. प्रतिमा इंगोले उपस्थित होत्या. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. विनय दांदळे, अभंगकार प्रवीण हटकर, कवी संतोष भाकरे कथालेखिका अर्चना मोरे, यांची मंचावर उपस्थिती होती. मान्यवरांनी बालकुमारांच्या स्पष्ट भूमिकेचे कौतुक करत पर्यावरण रक्षण ही आजच्या काळातील सर्वात मोठी सामाजिक गरज असल्याचे प्रतिपादन केले.

या परिसंवादाचे संचालन तुळशिदास खिरोडकार यांनी केले. पाहुण्यांचे स्वागत आयोजन समितीच्या वतीने बबनराव कानकिरड आणि ज्ञानेश्वर मांडेकर यांनी केले. चौथ्या सत्रात बालकुमारांचे कवी संमेलन पार पडले. कु.रिधी अतुल काठोळे, मोहिनी नंदकिशोर माळी, गौरी योगरा चोंडके, कु.अशविनी प्रमोद ओईम्बे, आरुषी संदीप भुजाडे, जान्हवी जीवन देशमुख श्रावणी जगदिश ठाकरे, रिद्धी दिलीप जुनन काय धनश्री केशव चौके, आरूषी ठाकरे, अनुष्का ठाकरे तेजस्विनी धामोडे मोनाली देशमु खुशी ठाकरे, नंदिनी देशमुख, सुमित राठोड, विष्णु पंत जोध, शिवराज जामोदे यांनी सुंदर रचना सादर केल्या. संमेलनाध्यक्ष प्रा. डॉ. प्रतिमा इंगोले यांचे अध्यक्षतेखाली व प्रा. डॉ.विवेक हिवरे, प्रा. प्रविण ढोणे, डॉ. ज्योत्स्ना कानकिरड, स्वागताध्यक्ष प्रा. माया डिवरे, वनराई पुणे चे अमित वाडेकर, डॉ. विजय निलावार हिंगोली, मधुभाऊ घारड अमरावती, श्रीकृष्ण विखे पाटील, संमेलन संयोजक बबनराव कानकिरड यांचे प्रमुख उपस्थितीत संमेलनाचा समारोप झाला. सूत्रसंचालन डॉ. रावसाहेब काळे यांनी केले. आभार प्रदर्शन ज्ञानेश्वर मांडेकर यांनी केले.

मानोरा जि.वाशिम येशील बीज संग्राहक निखील हरिदास चव्हाण, नागपूर चे सुमित रमेश राठोड, रेणुका ग्रंथ वितरणचे श्रीकांत रांकर देशपांडे, वनराई ग्रंथ दालनाला विद्याथ्यानी भेट देवून ग्रंथ खरेदी केली.सर्वशी गजानन चौधरी, नवल कव्हळे, अजय जागीरदार, अंजली हिवाळे, ॲड भरत सावळे, बाळ काळणे, गजानन ढाले, सागर उकर्डे, राजू चिमणकर, भुजंगराव देशमुख गोपाळ घेगाटे, हफीफ सर, नईम फराज, मो साकीब, दिलीप झाडोकार, अरुण साखरकर, विक्रांत खंडेराव, गोपाल खाडे, सौ नीता खाडे, दिपाली खोडके यांचेसह मोठ्या संख्येने बालकुमार रसिक व प्रौढ पालकांची उपस्थिती होती.

# माजी विद्यार्थी स्नेहसंमेलन



प्रतिनिधी २० जानेवारी

**अकोला:** सार्वजनिक विद्यालय चोहोट्टा येथील १९७४ ते ७७ या वर्षात शिकलेल्या व ७७ साली १० वी पास झालेल्या विद्यार्थ्यांचे स्नेहमिलन ब्रह्मचारी महाराज संस्थान पानेट येथे आयोजित करण्यात आले होते.

स्नेहमिलन सोहळ्याचे अध्यक्ष आयोजन समितीचे अध्यक्ष नंदकिशोर अरबट होते. स्नेहमिलन सोहळ्याचा प्रारंभ मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून झाला, प्रमुख अतिथी म्हणून सार्वजनिक विद्यालयाच्या अध्यक्षा मीनाताई बुंदे होत्या. सर्व बंधू भगिनींच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात येऊन शाळेकरीता सरस्वतीची मूर्ती भेट देण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सोहळ्याच्या आयोजन समितीचे सचिव रामेश्वर खोडे यांनी केले. सुमारे ५० वर्षानंतर आपण भेटत असल्याने त्यांच्याशी संपर्क करणे किती कठीण होते, व तरीही त्यांच्याशी संपर्क कसा केला हे विस्तृत सांगितले. या प्रसंगी शांतारामजी काकड या शिक्षकांचा सपत्नी शाल व श्रीफळ देऊन तसेच ब्रह्मचारी महाराज संस्थान चे पुजारी गणेशराव देशमुख यांचा सत्कार करण्यात आला. काही वर्ग बंधू भगिनी यांनी मनोगत व्यक्त करतांना अशा कार्यक्रमाचे मधून -मधून आयोजन करण्यात यावे अशी अपेक्षा व्यक्त केली. नंदकिशोर अरबट यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की यापुढे अशा प्रकारचा सोहळा घेतल्यास त्याचा आर्थिक बोजा आपण घेण्यास तयार असून त्याची नियोजनाची जबाबदारी अन्य बंधूंनी घ्यावी.

सुनील कु-हेकर समारोपीय भाषणात म्हणाले की हा समारोप केवळ स्नेह मिलन सोहळ्याचा असून संबंध वाढविण्याचा प्रारंभ बिंदू आहे. कार्यक्रमाचे संचालन सुनील पांडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता नंदकिशोर अरबट, ज्ञानेश्वर मोडक, पुरुषोत्तम धुमाळे, रामेश्वर खोडे, सुनील कु-हेकर, सुनील पांडे, सुधाकर मोडक, विजय गावंडे, प्रकाश कुकडे, प्रकाश पाचबोले, मधुकर काळे, अशोक देशमुख, सुशीला बोरचाटे, छाबुताई अरबट, पद्मकला मोडक, महानंदा मोडक यांनी परिश्रम घेतले.

सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला शहरात उपलब्ध आहे

परळीकर न्यूजपेपर एजन्सी — डाबकी रोड 9766005335

अरुण गुजर बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9423429605

येळणे बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9028947634

वाडेकर बुक स्टॉल — जुने बस स्टँड 9921940878

यश न्यूज पॉईंट — मलकापूर 9075012816

मेडोना युनुसेट सलून — बाराज्योर्तिलींग रोड, अकोला 7507340789

पेंटर पाठक एजन्सी — महानगर पालिका मागे, अकोला 8605844453

जाहिरातीसाठी संपर्क 9209956616 | बातम्यासाठी संपर्क 9075012801

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
मंगळवार, दि. २० जानेवारी २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# चिमुकल्याची निर्घृण हत्या; पित्याला जन्मठेपेची शिक्षा

## पांढरकवडा न्यायालयाचा निकाल

प्रतिनिधी २० जानेवारी



**यवतमाळ :** अवघ्या दीड वर्षाच्या पोटच्या मुलाला दगडावर आपटून निर्घृणपणे ठार केल्याप्रकरणी जन्मदात्या पित्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. सहा वर्षांपूर्वी घडलेल्या या धक्कादायक घटनेचा निकाल सोमवारी (दि. १९) पांढरकवडा येथील सत्र न्यायालयाने दिला.

पिंटू सुधाकर चव्हाण (वय २७, रा. गणेशपूर वाई, ता. पांढरकवडा) असे शिक्षा ठोठावण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. १७ मे २०२० रोजी रात्री साडेआठच्या सुमारास गणेशपूर येथे ही घटना घडली होती. घरगुती वादातून आरोपीने प्रथम मोठ्या मुलाला मारहाण केली. पत्नी सैनाबाई मध्ये पडल्याने तिलाही काठीने मारहाण करण्यात आली. वादाच्या दरम्यान आरोपीने पत्नीच्या कुशीत असलेल्या दीड वर्षाच्या सावनला हिसकावून घेतले व घराजवळील शेतात नेऊन दोन्ही पाय धरून त्याला जमिनीवर आदळले. त्यानंतर डोके, तोंड व छातीवर मारहाण करून त्याचा मृत्यू घडवून आणला.

या प्रकरणी १८ मे २०२० रोजी पांढरकवडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तपास पोलिस उपनिरीक्षक सत्यजित मानकर यांनी केला. तपासाअंती आरोपीविरोधात भादंवि कलम ३०२, ३२३, ३२४ व ५०४ अन्वये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. सत्र न्यायाधीश अभिजित देशमुख यांनी सर्व पुरावे व साक्षींचा विचार करून आरोपीस भादंवि कलम ३०२ अंतर्गत जन्मठेप व दहा हजार रुपये दंड, दंड न भरल्यास सहा महिने सश्रम कारावास, तसेच इतर कलमांखाली स्वतंत्र शिक्षा सुनावली. सर्व शिक्षा एकत्र भोगण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

सरकार पक्षातर्फे शासकीय अभियोक्ता रमेश डी. मोरे यांनी काम पाहिले. तर आरोपीची बाजू ॲड. सिद्धार्थ लोढा व ॲड. आर. के. शेख यांनी मांडली. या खटल्यात पाच साक्षीदार महत्त्वाचे ठरले. पैरवी अधिकारी म्हणून सहायक पोलीस निरीक्षक मनोहर कुमरे यांनी काम पाहिले.

# पांढरकवडा नगरपालिकेत शिवसेनेचे वर्चस्व; सातही विषय समित्यांवर निर्विवाद सत्ता

प्रतिनिधी २० जानेवारी



**पांढरकवडा :** पांढरकवडा नगरपरिषदेच्या विषय समित्यांच्या सभापती व उपसभापती पदांसाठी सोमवारी (दि. १९) झालेल्या विशेष सभेत शिवसेनेने (शिंदे गट) सातही विषय समित्यांवर वर्चस्व प्रस्थापित केले. या निवडीमुळे नगरपालिकेत शिवसेनेची एकहाती सत्ता अधिकृतपणे स्थिर झाली आहे.

दुपारी दोन वाजता झालेल्या सभेत सार्वजनिक बांधकाम समितीच्या सभापतीपदी प्रफुल जिड्डेवार, शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक समितीच्या सभापतीपदी सविता गटलेवार, स्वच्छता, वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य समितीच्या सभापतीपदी गणेश धुर्वे, पाणीपुरवठा व जलनिसारण समितीच्या सभापतीपदी आतिश चव्हाण, नियोजन व विकास समितीच्या सभापतीपदी शैलीन सबरीन खान, तर महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी भाग्यश्री कडू यांची निवड करण्यात आली. उपसभापतीपदी जयश्री शेंडे यांची निवड झाली.

या यशाचे श्रेय पालकमंत्री संजय राठोड, खेतानी फाउंडेशनचे अध्यक्ष सलीम भैया खेतानी, जिल्हा संपर्क प्रमुख हरिहर लिंगणवार, जिल्हा प्रमुख राजुदास जाधव, जिल्हा समन्वयक साजिद शरीफ, तालुकाप्रमुख राकेश नेमणवार तसेच शिवसेना नेते मोहसीन काजी यांच्या मार्गदर्शनाला देण्यात आले. नगरपरिषद उपाध्यक्ष आतिश चव्हाण यांना पाणीपुरवठा व जलनिसारण समितीचे पदसिद्ध सभापतीपद देण्यात आले आहे. त्यामुळे शहरातील पाणीपुरवठा व मूलभूत सुविधांवरील शिवसेनेचे नियंत्रण अधिक बळकट झाले आहे.

या निवडीनंतर शिवसेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, रस्ते विकास, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य सेवा तसेच महिला व बालकल्याण क्षेत्रात गतीमान व लोकाभिमुख कामे करण्यात येतील, असा विश्वास नवनिर्वाचित सभापतींनी व्यक्त केला.

# ट्रॅफिक पोलिसांच्या तत्परतेमुळे प्रवाशाचे प्राण वाचले



प्रतिनिधी २० जानेवारी

**यवतमाळ :** धामणगावहून यवतमाळकडे येणाऱ्या बसमधील एका तरुण प्रवाशाला अचानक हृदयविकाराचा झटका आल्याची घटना नववर्षाच्या दिवशी घडली. मात्र, ट्रॅफिक पोलिसांच्या तत्परतेमुळे त्या प्रवाशाचे प्राण वाचले.

SBI चौकात कर्तव्यावर असलेले जिल्हा वाहतूक शाखेतील पोलीस हवालदार निलेश झाडे यांना बसमधील कंडक्टरने एका प्रवाशाची प्रकृती अत्यवस्थ असल्याची माहिती दिली. रोशन गणेश बुटके (२५, रा. कवठा रेल्वे, ता. पुलगाव, जि. वर्धा) असे त्या प्रवाशाचे नाव आहे. माहिती मिळताच झाडे यांनी कोणताही विलंब न करता संबंधित प्रवाशाला ऑटो रिक्षातून तातडीने शासकीय रुग्णालयात दाखल केले. वेळेवर उपचार मिळाल्यामुळे रुग्णाचे प्राण वाचल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केले. या प्रसंगानंतर रुग्णाच्या मित्र व नातेवाईकांनी पोलीस हवालदार झाडे यांच्या तत्परतेबद्दल आभार व्यक्त केले. तसेच त्यांच्या या मानवतावादी कार्याची दखल घेत पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला.

# देशी बनावटीची पिस्टल जप्त



प्रतिनिधी २० जानेवारी

**यवतमाळ :** पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ अंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने अवैध देशी बनावटीची पिस्टल जप्त केली. तपासात दोन्ही जिवंत काडतूस व एका चाकू जप्त केला असून आरोपीला अटक केली.

दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार अजिंक्य विनोद नाचपेलवार यास ताब्यात घेतले गेले. त्याच्याकडून एक लोखंडी देशी बनावटीची पिस्टल (मॅगझीनसह), २ जिवंत काडतूस, स्टील सारखा चाकू आणि मोपेड वाहन जप्त करण्यात आले. एकूण मुद्देमालाचे मूल्य १,४२,५००/- रुपये आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक यवतमाळ कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

# दोन तरुणांची गळफास घेऊन आत्महत्या

## नागापूर (रुपाळा) गावावर शोककळा

प्रतिनिधी २० जानेवारी

**उमरखेड :** तालुक्यातील नागापूर (रुपाळा) या एकाच गावात अवघ्या बारा तासांच्या अंतराने दोन तरुणांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याच्या धक्कादायक घटनांमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून गावावर शोककळा पसरली आहे.

**पहिली घटना :** 21 वर्षीय सावन जाधव यांनी दि. 18 जानेवारी रोजी सायंकाळी सुमारे 6 वाजताच्या सुमारास आपल्या राहत्या घरात आत्महत्या केल्याची घटना घडली तर या प्रकरणी बाळु बिबिषण राठोड (वय 45 वर्षे, रा. नागापूर रुपाळा) यांनी उमरखेड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.





तर दुसरी घटना बारा तासाच्या फरकाने दि 19 रोजी सकाळी 7 वाजताच्या सुमारास 20 वर्षीय तरुण पवन नामदेव इंगळे रा नागापूर (रुपाळा) यांनी एका झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे उघडकीस आले.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी गावातील सेवालाल महाराजाच्या ओट्यावर बसले असताना त्यांची बहीण सिमाबाई यांनी आरडाओरड केली. त्यामुळे ते तात्काळ तिच्या घरी गेले. घराचा दरवाजा तोडून आत पाहिले असता, सावन जाधव याने टिनपत्राखालील लोखंडी चॅनलला साडीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे आढळून आले. सदर घटनेची उमरखेड पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

**दुसरी घटना :** यानंतर अवघ्या 12 तासांनी, दि. 19 जानेवारी रोजी सकाळी सुमारे 7 वाजताच्या दरम्यान, याच गावातील आणखी एक तरुण पवन नामदेव इंगळे (वय 20 वर्षे, रा. नागापूर रुपाळा) याने शेतात आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. नागापूर रुपाळा शिवारातील पवन बंग यांच्या शेतामधून जाणाऱ्या बंद कॅनॉलच्या बाजूला असलेल्या बाभळीच्या झाडाला गळफास घेऊन पवन इंगळे याने जीवन संपवले. त्या मार्गाने ये-जा करणाऱ्या नागरिकांच्या ही बाब लक्षात येताच त्यांनी मृतकाच्या वडिलांना माहिती दिली. यानंतर गावात एकच खळबळ उडाली.माहिती मिळताच उमरखेड पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह उपजिल्हा रुग्णालय येथे पाठवण्यात आला डॉक्टरांनी तपासणीनंतर पवन इंगळे यांना मृत घोषित केले.मृतकाच्या पश्चात आई-वडील व भाऊ असा परिवार आहे. पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार जयकुमार राठोड पुढील तपास करीत आहेत.

# आर्णीत 'फन फिट मॅराथॉन'



प्रतिनिधी २० जानेवारी

**आर्णी :** आर्णी शहरात गिरी किडझीच्या वतीने रविवारी (दि. १ फेब्रुवारी) सकाळी सहा वाजता फन फिट मॅराथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. शहरात सलग दुसऱ्या वर्षी या मॅराथॉनचे आयोजन होत असून नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग अपेक्षित आहे.

ही मॅराथॉन सहा गटांत घेण्यात येणार असून प्रत्येक गटासाठी प्रत्येकी दहा बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. ३० डिसेंबरपासून स्पर्धेसाठी नोंदणी सुरू झाली असून २६ जानेवारी २०२६ पर्यंत ऑनलाईन नोंदणी करता येणार आहे.

**मॅराथॉनचे गट पुढीलप्रमाणे आहेत :-** १४ वर्षांखालील, १८ वर्षांखालील, फॅमिली फन रेस, सिनीअर सिटीझन, तसेच ओपन कॅटेगरी. आरोग्य, फिटनेस व कुटुंबीय सहभागाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती आयोजन समितीच्या वतीने मुख्याध्यापक सोनाली अभिजीत गिरी यांनी दिली.

# डॉ.ओमप्रकाश शेटे जिल्हा दौऱ्यावर

प्रतिनिधी २० जानेवारी

**यवतमाळ :** आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे हे बुधवार, दि. 21 जानेवारी, 2026 रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रमाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे. शेटे बुधवार,21 जानेवारी रोजी सकाळी 7.50 वाजता नागपूर येथून वाहनाने यवतमाळकडे प्रयाण.सकाळी 11 वाजता आगमन श्री. सत्यसाई संजिवनी माता व बाल रुग्णालय येथे भेट.दुपारी 3 वाजता एकत्रित आयुष्मान भारत – प्रधानमंत्री जन आयोग योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आयोग्य योजनेची आढावा बैठक,आयुष्मान भारत कार्ड वितरण. सांय. 4 वाजता पत्रकार परिषद स्थळ जिल्हाधिकारी कार्यालय, त्यानंतर सायंकाळी यवतमाळ येथून वाहनाने नागपूरकडे प्रयाण करतील.

# विद्यार्थ्यांसाठी 'तारे जमीन पर' कार्यक्रम

## नाईक फाऊंडेशन व पुसदच्या शिक्षण विभागाचा पुढाकार

प्रतिनिधी २० जानेवारी

■ **पुसद :** ना.इंद्रनिल नाईक यांचे वाढदिवसाचे औचित्य साधून शाळकरी विद्यार्थ्यांसाठी पुसद येथील सुधाकर नाईक प्रेक्षागृहात बुधवारी(ता.२८) 'तारे जमिन पर' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून पुसद विधानसभा मतदार संघातील जिल्हा परिषद व नगरपालिका शाळांनी आपल्या विद्यार्थ्यांना ह्या सुवर्णसंधीला लाभ देऊन त्यांच्यातील सुप्त गुणांना चालणा देण्यासाठी सहभाग नोंदवावा असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

नाईक फाऊंडेशनच्या अध्यक्ष ॲड. मोहिनी नाईक यांच्या मार्गदर्शनात ना. ॲड. इंद्रनिल नाईक यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून गेल्या दोन वर्षांपासून विशेष करुन ग्रामीण भागातील जि.प. व नगर परिषद शाळांतील विद्यार्थ्यांना दर्जेदार व्यासपीठातून त्यांच्या अंगी असलेल्या सुप्त कला-गुणांना वाव मिळावा यासाठी 'तारे जमिन पर' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

यावर्षीही नगराध्यक्ष ॲड. मोहिनी नाईक यांच्या मार्गदर्शनात नाईक फाऊंडेशन व पुसदच्या शिक्षण विभागाने पुढाकार घेऊन महाराष्ट्राची संत परंपरा /वारकरी संप्रदाय, शेतकऱ्यांचे कैवारी वसंतराव नाईक, गोंधळ/ जागरण, ट्रीब्यूट टू मराठी सिनेमा, गाण सम्राज्ञी लता मंगेशकर, आदिवासी संस्कृती, शिवछत्रपतींचा महाराष्ट्र, महाराष्ट्राचे शिक्षण चळवळ महात्मा ज्योतिबा /सावित्री, आमची माती आमची माणसं, महाराष्ट्राच्या लेकी, लावणी, भारतीय सैन्यातील महाराष्ट्राचे योगदान, मुंबई मेरी जान, कोळी नृत्य, संविधान कर्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बंजारा संस्कृती, स्वातंत्र्य लढ्यातील महाराष्ट्राचे योगदान, महाराष्ट्रातील सण उत्सव, दादा कोंडके, भारुड, खेळाडूंचा महाराष्ट्र या एकवीस थिम्सवर आधारीत नृत्य व नाटिका सादर करण्यासाठी प्रत्येक शाळेने सहभागी होउन केंद्रस्तरावर सादरीकरण करावे व केंद्रस्तरावर निवड झालेल्या शाळांनी तालुकास्तरावर दर्जेदार कार्यक्रम सादर करावा.

त्यासाठी किमान २० व कमाल ३० विद्यार्थी असावे व जास्तीत जास्त १० मिनिटांचे सादरीकरण करावे प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना सन्मानचिन्हे, खेळ क्रीडा कीट, स्कुल बॅग, एक्साम्पॅड, प्रमाणपत्र देण्यात येणार असून आयोजित कार्यक्रमात जास्तीत जास्त शाळा व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घ्यावा असे आवाहन पुसद नगर परिषदेच्या नगराध्यक्ष तथा नाईक फाऊंडेशनच्या अध्यक्ष ॲड. मोहिनी नाईक यांच्या मार्गदर्शनात पुसद पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी धिरज आडे यांचेसह शिक्षण विभागातील सर्व अधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक आणि ना. इंद्रनील नाईक मित्र परिवार यांनी केले आहे.

# संगीतमय शिवमहापुराण कथेने दुमदुमला भक्तीचा सुर

## निता आडे यांच्या रुग्णवाहिकेचे लोकार्पण

प्रतिनिधी २० जानेवारी

**आर्णी :** जवळा परिसरात 'संगीतमय श्री शिवमहापुराण' कथेचे भव्य आयोजन करण्यात आले. या आध्यात्मिक सोहळ्याला प.पु. शिरिष महाराज बारी (हरिद्वार) यांनी आपल्या सुमधुर वाणीतून रंगत दिली. कथा प्रसंगांमध्ये भक्तांची संख्या मोठ्या प्रमाणात होती. यावेळी निता राजेश आडे यांच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत गरजू रुग्णांसाठी सुसज्ज रुग्णवाहिकेचे लोकार्पण करण्यात आले.

शिव महापुराणातील विविध प्रसंगांना रसाळ आणि प्रभावीपणे सादर करतांना शिरिष महाराज बारी यांनी भक्तांना आध्यात्मिक प्रबोधन दिले. 'चालता-फिरता दवाखाना' म्हणून रुग्णवाहिका समर्पित करत, निताताई आडे यांनी ग्रामीण भागातील रुग्णांना तातडीने उपचार मिळावेत, यासाठी ही महत्त्वाची योजना हाती घेतली आहे. लोणी-जवळा सर्कल क्षेत्रातील लोकांसाठी ही रुग्णवाहिका 'संजीवनी' ठरणार आहे, असा विश्वास कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला. आध्यात्मिक सोहळ्याच्या माध्यमातून सामाजिक कार्याची चांगली जाणीव निर्माण झाली असून, या उपक्रमामुळे निताताई आडे आणि आयोजक समितीचे कौतुक होत आहे.



# आर्णीत भेसळयुक्त दुधाची विक्री

## नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

प्रतिनिधी २० जानेवारी

■ **आर्णी :** आर्णी शहरात भेसळयुक्त दुधाच्या विक्रीबाबत नागरिकांमध्ये चर्चा आहे. या प्रकारामुळे सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. दररोज शहरात मोठ्या प्रमाणात दुधाची विक्री होत असली तरी दुधाच्या पुरवठ्याबाबत पारदर्शकता नसल्याने संशय व्यक्त केला जात आहे.



शहरातील विविध भागांत सकाळी व सायंकाळी दूध विक्री केली जाते. मात्र दूध संकलन, वाहतूक आणि विक्री प्रक्रियेवर नियमित तपासणी होत नसल्याने भेसळीची शक्यता नाकारता येत नाही, असे मत नागरिकांकडून व्यक्त होत आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्ती यांच्या आरोग्यावर याचा विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, दूषित अथवा निकृष्ट दर्जाच्या दुधाच्या सेवनामुळे पचनसंस्थेचे विकार, उलटी, जुलाब तसेच दीर्घकालीन आरोग्य समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे दुधाच्या गुणवत्तेबाबत दक्षता आवश्यक असल्याचे ते सांगतात.

या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासन तसेच संबंधित यंत्रणांनी दूध विक्री करणाऱ्या दुकानांची व वाहतूक व्यवस्थेची नियमित तपासणी करावी, दुधाचे नमुने तपासणीसाठी घ्यावेत आणि दोष आढळल्यास संबंधितांवर नियमांनुसार कारवाई करावी, अशी मागणी शहरातील नागरिकांकडून होत आहे. शुद्ध व सुरक्षित दूधपुरवठा सुनिश्चित करणे ही प्रशासनाची जबाबदारी असून, याबाबत तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराजांच्या पादुका दर्शन सोहळा; भाविकांचा उस्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी २० जानेवारी

**महागाव :** जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या अंधश्रद्धा निर्मूलन उपक्रमांतर्गत अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी रामानंदाचार्य (दक्षिणपीठ, नाणिजधाम) यांचा पादुका दर्शन व प्रवचन सोहळा रविवारी महागाव शहरातील क्रीडा संकुल परिसरात उत्साहात संपन्न झाला.



या सोहळ्यास उमरखेड–महागावचे आमदार किशनराव वानखेडे, माजी आमदार राजूभाऊ नगरधने, महागावच्या नगराध्यक्षा सौ. सुनंदाताई दिलीप कोपरकर, उमरखेडच्या नगराध्यक्षा सौ. तेजश्री संतोषराव जैन यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

जगद्गुरुश्रींच्या सिद्ध पादुका नगराध्यक्षा सौ. सुनंदाताई कोपरकर यांच्या निवासस्थानी ठेवण्यात आल्या होत्या. त्यानंतर सजवलेल्या रथातून शहरात भव्य शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेत निशानधारी महिला-पुरुष, कलशधारी महिला, डफली व बँड पथक, भजनी मंडळ, राम पंचायतन आदी पथकांचा सहभाग होता. संतपीठावर पादुकांचे आगमन झाल्यानंतर सामुदायिक आरती करण्यात आली. सामाजिक उपक्रमांतर्गत निराधार महिलांना १३ शिलाई यंत्रांचे मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी ज.न.म. प्रवचनकार सौ. आशाताई राऊत यांचे प्रभावी व सुमधुर प्रवचन झाले. यानंतर गुरु पूजन, उपासक दीक्षा, जगद्गुरुश्रींचे अमृततुल्य ऑनलाईन प्रवचन, सिद्ध पादुका दर्शन, रक्तदान शिबिर, पुष्पवृष्टी व सांगता आरती असे विविध कार्यक्रम पार पडले. या सोहळ्यात २३१ भाविकांनी उपासक दीक्षा घेतली. सुमारे पाच ते सहा हजार भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. दिवसभर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भारत वानखेडे व अभिलाष कदम यांनी केले, तर आभार प्रदर्शन जिल्हाध्यक्ष गजानन गरवारे यांनी केले. सोहळा यशस्वी करण्यासाठी जिल्हा, तालुका व सेवा केंद्र समित्यांसह विविध संघटनांचे पदाधिकारी, गुरुसेवक व भाविकांनी परिश्रम घेतले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

मंगळवार दि. २० जानेवारी २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

## जिल्हास्तरीय प्रदर्शन व विक्री महोत्सवाचा समारोप



**वाशीम :** जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अंतर्गत उमेद अभियानाच्या जिल्हास्तरीय प्रदर्शन व विक्री महोत्सवाचा समारोप खासदार सईताई डहाके यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी चौहान, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किरण कोवे, जिल्हा आरोग्य अधिकारी पांडुरंग ठोंबरे, जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक धैर्यशील पाटील, जिल्हा अभियान व्यवस्थापक सुधीर खुजे यांची उपस्थिती होती. तीन दिवस चाललेल्या प्रदर्शनीमध्ये बचत गटाच्या विविध स्टॉल्स वरून चांगली विक्री करण्यात आली. खासदार सईताई डहाके यांनी काही स्टॉलला भेट देऊन महिलांचा उत्साह वाढविला. समारोपीय कार्यक्रमात सर्वाधिक विक्री झालेल्या बचत गटांचा सन्मान करण्यात आला.

# बहुचर्चित पोकरा घोटाळा, कारवाईकडे सर्वांचा डोळा !




## चौकशीचा प्राथमिक अहवाल वरिष्ठांकडे सादर

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अर्थात पोकरा या योजनेतील कथित गैरप्रकाराने जिल्ह्यात खळबळ उडवून दिली आहे. रिसोड तालुक्यातील शेलुखडसे येथील एका शेतकऱ्याने केलेल्या तक्रारीतून पोखरा योजनतील गैरप्रकार संपूर्ण जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरत आहे. परिणामी कृषी विभागाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पोखरा घोटाळा फसवेगिरीतून पैसा गेला गोळा ! अशा चर्चेला उधाण आले असतांनाच, मंगरूळपीर तालुका कृषी अधिकाऱ्याने फळबागेचे अनुदान मागणाऱ्या एका शेतकऱ्याला चक्क बुटाने मारहाण केल्याची घटना समोर आली होती. सदर प्रकरणात त्या अधिकाऱ्याला प्रशासनाने तडफडकी निलंबित केले आहे.

त्याच प्रमाणे जिल्ह्यातील पोकरा गैरप्रकाराने कृषी विभागाची लक्तरे वेशीवर टांगली जात आहेत. याही प्रकरणातील सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा अनेक शेतकरी संघटनांनी दिला आहे. सदर गैरप्रकाराची पारदर्शक चौकशी करून दोषींवर योग्य ती कारवाई झाली तरच पोकरा भाग दोन ही योजना सर्वंकष शेतकऱ्यांच्या फायद्याची ठरेल असे जाणकार बोलत आहेत.

रिसोड तालुक्यातील शेलुखडसे येथील शेतकरी वसंत खडसे यांनी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अर्थात पोखरा योजनेमधील गैरप्रकाराची तक्रार थेट राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. या तक्रारीत वसंत खडसे यांनी अनेक मुद्दे उपस्थित करत सरकारचे व प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. यात कुठलीही फळबाग लागवड न करता एकाच कुटुंबातील तेही पती आणि पत्नीच्या नावावर घेतलेले लाखों रुपयांचे फळबागेचे अनुदान हा मुद्दा विशेष लक्षवेधी ठरत आहे. तर कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी संगनमताने काही मर्जीतल्याच कुटुंबात लाखों रुपयांचे अनुदान कसे वितरित केले हा कळीचा मुद्दा उपस्थित केला आहे. परिणामी या गंभीर तक्रारीची दखल घेत मुख्यमंत्री कक्ष

### ग्राम कृषी संजीवनी समिती फक्त नावालाच...

चौकशी बाबत काही शेतकरी नेत्यांनी चौकशी अधिकारी यांच्याकडे विचारणा केली आहे. त्यात स्थानिक ग्राम पंचायत सरपंच व ग्राम कृषी संजीवनी समितीला संपूर्ण अधिकार देण्यात आले असल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र या बाबत प्रत्येक ठिकाणी शहानिशा केली तर सदर गावातील ग्राम कृषी संजीवनी समिती ही केवळ नावालाच असल्याची धक्कादायक बाब समोर आली असून या निवडी बाबत आम्ही कुठलाही ठराव देऊन एकाच कुटुंबात लाखों रुपयांचे अनुदान देण्याची शिफारस केली नसल्याचे समितीचे पदसिद्ध अध्यक्ष सांगत आहेत. या प्रकरणात त्यांनी आपल्या प्रतिक्रिया सुद्धा व्यक्त केल्या आहेत. त्या पुढील वृत्तात समोर येणार आहेतच. मात्र या सर्व आश्चर्यचकित प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी जोर धरत आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम यांनी या प्रकरणी चौकशी सुरू केली आहे. त्या अनुषंगाने तपास अधिकारी म्हणून अनिल राठोड यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली आहे. शिवाय तक्रारीतील ईतर मुद्द्यांची बारकाईने पाहणी करून पुराव्यातील कागदपत्रे व ईतर गोपनीय चौकशी अहवाल वरिष्ठांकडे पाठविला असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

शेलुखडसे येथील विवादित पोकरा तक्रारीमुळे रिसोड तालुक्यातील मोप, लोणी, मोरगव्हाण, भर जहाँगीर व ईतर पोखरा भाग - १ मध्ये समाविष्ट असलेल्या अनेक गावतून आता नवनव्या तक्रारी उजागर होत आहेत. त्यामुळे तालुका कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक, कृषी सहाय्यक आणि सबंधित दलालांची पाचावर धारण बसली आहे. ' खाली पडलेले शेण ' आता माती घेऊन उठणार! या भीतीने तालुका कृषी विभागात एकच सन्नाटा पसरला आहे. स्वतःच्या आर्थिक स्वार्थापोटी प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी यांच्या कमिशनखोरीमुळे जवळपास ऐंशी टक्के शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसल्या गेली आहेत. परिणामी या



महत्वाकांक्षी योजनेची जिल्ह्यात वाट लागली आहे. ईतर जिल्ह्यात सुद्धा या योजनेचा कसा बट्ट्याबोळ करून टाकला होता हे या आधीच्या पोकरा मधील तक्रारीतून सिद्ध झाले आहे. त्यामुळे वाशिम मधील या गंभीर प्रकरणाकडे केवळ जिल्ह्याचेच नव्हे; तर संपूर्ण राज्याचे लक्ष वेधले जात आहे. प्राथमिक चौकशी अहवाल वरिष्ठांकडे गेला असला तरी कारवाई काय होईल? की सर्वांचेच हात ओले असल्याने थातुरमातुर चौकशी करून प्रकरण दडपण्यात येईल ? असे अनेक प्रश्न उपस्थित केले जात असल्यामुळे पुढील कारवाईकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. सदर प्रकरणात कोणाची पाठराखण करण्यासाठी चौकशी दडपण्याचा प्रयत्न केला तर राज्यभर आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा अनेक संघटनांनी दिला आहे.

**पोकरा - २ साठी कारवाई होणे गरजेचे**

## थोडक्यात

### संत रविदास महाराज जयंती व समाज मेळाव्याचे आयोजन

• सिटी न्युज ब्युरो @ कारंजा •

सामाजिक एकता व प्रबोधनव्हावे या उद्देशाने राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या कारंजा तालुका शाखेच्या वतीने कारंजा



येथे श्री.संत रविदास महाराज जयंती उत्सव व चर्मकार समाज मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.येत्या १ फेब्रुवारी रोजी मंगरूळपीर मार्गावरील रिलायन्स पेट्रोल पंप जवळच्या महालक्ष्मी मंगलम येथे सकाळी ११ वाजता होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कारंजा पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी श्रीकांत माने असतील तर प्रमुख अतिथी म्हणून सेवानिवृत्त तालुका कृषी अधिकारी मधुकरराव सोनटक्के,कारंजा नगर परिषदेचे सेवानिवृत्त कर निरीक्षक रामकृष्ण रावळे,सेवानिवृत्त शिक्षक प्रल्हादराव पानझाडे, सेवानिवृत्त सैनिक विष्णू घुडे,जीवन प्राधिकरणचे सेवानिवृत्त कर्मचारी गणेशराव भटकर,भडशिवणी ग्रामपंचायतच्या सरपंच सौ.वर्षाताई अंबाळकर,कारंजा नगरपरिषदेच्या शिक्षिका सौ.प्रमिलाताई गाठेकर(भटकर), सदाशिवराव राजगुरे धामणी (खडी),गजाननराव शेगोकार, बेंबळा,पांडुरंग चिमणकर बेलखेड (कामठा),भारतीय रेल्वेचे सेवानिवृत्त सीनियर सेक्शन इंजिनियर शंकरराव पानझाडे कामरगाव,अरुणराव वानरे शिरसोली,धनज बु.ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच प्रवीण ढाकरे,दिगंबरराव ठाकरे निंभा जहागीर,शिक्षक बंडू ढाकरे भामदेवी,पिंपळगाव खुर्द ग्रामपंचायतचे माजी सदस्य नथ्थू शेगोकार हे उपस्थित राहणार आहेत.दरम्यान या कार्यक्रमाला कारंजा तालुक्यातील चर्मकार समाज बांधवांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या कारंजा तालुका शाखेने केले आहे.

### जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस नियोजन करणे -ना.भरणे

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस व परिणामकारक नियोजन करणे



अत्यंत आवश्यक आहे. शासनाने जिल्ह्यासाठी मंजूर केलेला निधी कोणत्याही परिस्थितीत व्यपगत होऊ न देता तो वेळेत व योग्य कामांसाठी वापरला गेला पाहिजे. लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांनी परस्पर समन्वय राखून काम केल्यास विकासकामांना निश्चितच गती मिळते. पायाभूत सुविधा, शेती, उद्योग, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक न्यायाशी संबंधित योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून सामान्य नागरिकांना त्याचा थेट लाभ मिळेल, यासाठी सर्व यंत्रणांनी नियोजनबद्ध व जबाबदारीने कार्य करावे.असे प्रतिपादन राज्याचे कृषी मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना.दत्तात्रय भरणे यांनी केले. जिल्हा नियोजन समितीची महत्त्वपूर्ण सभा नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम येथे आयोजित करण्यात आली.यावेळी ना.श्री.भरणे दुरदृश्यप्रणालीव्दारे आढावा सभेत बोलत होते.

## शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी 'संगमनेर पॅटर्न' संपूर्ण जिल्ह्यात राबवावा - ॲड. निलेश हेलोंडे

### कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनची आढावा बैठक

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे हा शासनाचा तसेच कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचा मुख्य उद्देश असून, पारंपरिक शेतीसोबत पूरक व्यवसाय, आधुनिक पिक पद्धती आणि सहकाराच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे आवश्यक आहे. संगमनेर पॅटर्न हा शेती विकासाचा यशस्वी नमुना असून, तो वाशिम जिल्ह्यात प्रभावीपणे राबविल्यास शेतकऱ्यांचे उत्पादन व उत्पन्न वाढून त्यांचे जीवनमान उंचावेल, असे प्रतिपादन कै. वसंतराव नाईक स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांनी केले.

मानोरा येथील शासकीय विश्रामगृह येथे आयोजित आढावा बैठकीत शेतकऱ्यांसाठी विविध विभागांमार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी मानोरा तहसीलदार उमेश



बन्सोड, गटविकास अधिकारी विलास जाधव, तालुका पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. व्ही. ओ. रोम, बालविकास प्रकल्प अधिकारी श्री. कदम, तालुका कृषी अधिकारी उमेश राठोड यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

दि. ७ जुलै २०२४ च्या शासन निर्णयानुसार मानोरा तालुक्यातील कारखेडा येथे ई-क्लास जमिनीवर चारा लागवड प्रकल्प राबविण्यात येणार असून, त्यासाठी झटका मशिन व तार कुंपणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या बैठकीस कारखेडा गावचे सरपंच , नागरिक तसेच पत्रकार उपस्थित होते.

## ठाकरे कुटुंबातील तीन ऐक्यांची शान, गावाचा वाढवला मान !

• अनंता घुगे @ शेलुबाजार •

शेलुबाजार : नजीकच्या चोरद व जनूना खुर्द गट ग्राम पंचायत असलेल्या या छोट्याशा खेडे गावातील तीन सख्ख्या भावांची बीएसएफ मधे निवड झाली आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्यांनी हे यश संपादन केले आहे. त्यांच्या या निवडीमुळे संपूर्ण तालुक्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. तर हे तीन एक्के म्हणजे आमच्या गावाची शान असल्याचे गावकरी अभिमानाने बोलत आहेत. मंगरूळनाथ तालुक्यातील गट ग्रामपंचायत चोरद व जनुना खुर्द येथील तीन युवक गोपाल ठाकरे रूपेश ठाकरे हे सख्खे भाऊ असुन सुभाष गजानन ठाकरे हा त्यांचा चुलत भाऊ आहे गोपाल व रूपेश यांनी बी.एस्सी .तर सुभाष यांनी एम.ए.चे शिक्षण पुर्ण केले.

या तिन्ही भावांनी अत्यंत



**एकाच कुटुंबातील तीन भावंडे बीएसएफमधे दाखल**

प्रतिकूल परिस्थितीवर मात करत बिएसएम मध्ये निवड मिळवून तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. कोणतेही भरतीपूर्व सैन्य प्रशिक्षण न घेता, केवळ स्वकष्ट, चिकाटी आणि जिद्दीच्या बळावर गोपाल रूपेश व सुभाष हे यश संपादन केले असून, त्याची ही यशोगाथा ग्रामीण भागातील तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.घरची आर्थिक परिस्थिती बेताची. दैनंदिन गरजांसाठी संघर्ष करावा लागत असतानाही सैन्यात भरती होण्याचे स्वप्न जपले.

पहाटेच्या अंधारात सराव, धावणे, व्यायाम, लेखी व मैदानी परीक्षेची तयारी असा काटेकोर दिनक्रम त्याने अनेक वर्षे अव्याहतपणे पाळला. मार्गदर्शन व प्रशिक्षणासाठी आवश्यक साधनांची कमतरता असतानाही, उपलब्ध साधनांच्या आधारे स्वतः अभ्यासक्रम शोधून, नियोजनबद्ध तयारी करत त्याने स्वतःला सिद्ध केले. शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त आणि संघभावना या गुणांचा थेट फायदा सैन्य भरती प्रक्रियेत झाला.बि एस एम निवड झाल्याची बातमी समजताच ठाकरे कुटुंबीयांसह संपूर्ण चोरद व??? जनुना खुर्द परिसरात आनंदाचे वातावरण पसरले. ग्रामस्थ, मित्रपरिवार व क्रीडाप्रेमींनी गोपाल रूपेश व सुभाष यांचे अभिनंदन केले. अनेकांनी त्याच्या जिद्दीचे आणि कष्टाचे कौतुक करत भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. गरिबी, अडचणी आणि मर्यादा असूनही हार न मानता ध्येयाशी एकनिष्ठ राहिल्यास यश नक्की मिळते, हे गोपाल रूपेश व सुभाष आपल्या स्वकर्तृत्वातून सिद्ध केले आहे. त्याची ही कामगिरी वाशिम जिल्ह्यात व मंगरूळनाथ तालुक्याच्या तरुणांसाठी नवा आदर्श देणारी ठरणार आहे.

## विचारले नाही कारण, शेतकरी रचणार स्वत:चे सरण...

# रद्द करा धरण, नाहीतर सामुहिक मरण !

***जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी यांना दिले निवेदन *अधिकाऱ्यांचा स्वार्थासाठी मनमानी कारभार**

• सिटी न्युज ब्युरो @ कारंजा •

तालुक्यातील पिंप्री मोडक येथील धरणग्रस्त कृती समितीने १९ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम ,उपविभागीय कार्यालय ,लघु पाटबंधारे विभाग कारंजा ,लघु पाटबंधारे उपविभग मंगरूळपीर या कार्यालय धडक दिली. पिंप्री मोडक येथे होत असलेल्या धरण रद्द करण्याचे या आंदोलनामागील कारण होते. यावेळी जिल्हाधिकारी वशिम , उपविभागीय अधिकारी कैलास देवरे यांना धरणग्रस्त कृती समितीने निवेदन सादर केले.



त्यानुसार आमची जमीन जर धरणामध्ये गेली तर आम्हाला आत्महत्या केल्याशिवाय पर्याय उरणार नाही.कारण संबंधित अधिकाऱ्यांनी या प्रकल्पाबाबत कोणतीही सत्य माहिती शेतकऱ्यांना दिली नाही. जमिनीचे स्पष्ट भाव सांगितले नाही.शेतजमीन मोजण्याच्या नोटीस तसेच शेतीमधील विहिरी,बागायती झाडे इत्यादी मोजण्याची माहिती सुध्दा दिली नाही.या सर्वांचा परस्पर सर्वे व मोजमाप संबंधित अधिकाऱ्याला हाताशी धरून केला आहे.तसेच तामसवाडी व इंगळखेड ही दोन गावे उजाड असून यांना सुध्दा पिण्याच्या पाण्याचा व सिंचनाचा लाभ होईल असे सांगून अधिकाऱ्यांनी दिशाभूल केली आहे.तसेच शेतकऱ्यांची संमती घेतली नाही.८० टक्के शेतकऱ्यांनी अजूनपर्यंत या प्रकल्पासाठी संमती दिलेली नाही.धरणाच्या भिंतीमध्ये ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी जात आहेत अशा शेतकऱ्यांना अधिकाऱ्यांनी एक-एकटे बोलावून त्यांना जमिनीचे जास्त भावाचे प्रलोभन दाखवून व त्यांची दिशाभुल करुन त्यांच्याकडून संमती घेतली. ते सर्व शेतकरी आजरोजी धरणामध्ये जाणाऱ्या शेतीच्या तुटपुंज्या मोबदल्याची माहिती मिळताच प्रकल्पाच्या विरोधात गेले आहे.

संबंधित अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना अंधारात ठेवून हा प्रकल्प करण्याचा अट्टाहास केला.या धरणामध्ये आमची जमीन गेली तर ८० टक्के शेतकरी भुमिहीन होईल.पिंप्री मोडक येथे होणाऱ्या धरणाच्या मागे २ कि.मी.अंतरावर हिवरा लाहे येथील धरण आहे.पिंप्री मोडक येथील प्रकल्पात जाणारी शेती हिवरा लाहे धरणाच्या ओलिताखाली येते. या धरणाची भिंत गावाच्या ४०० मीटर अंतरावरुन जात असल्यामुळे गावाला धोका आहे.पिंप्री मोडक येथे परिसरामध्ये पाण्याची मुबलकता आहे.सिंचनाची व पिण्याच्या पाण्याची कोणतीही टंचाई नाही.जमिनीचा मोबदला हा मिळालेल्या माहितीनुसार अतिशय अल्पदरात मिळत असल्यामुळे या मिळालेल्या जमिनीच्या मोबदल्यात आम्ही इतर कोठेही जमीन घेऊ शकत नाही.त्यामुळे आम्हा शेतकऱ्यांवर उपासमारीची पाळी येईल.त्यात मुलाबाळांचे शिक्षण व पालनपोषण कसे करायचे.निसर्गाची अतिवृष्टी,सतत होणारी नापीकी तसेच उद्या आम्हाला गाव सुध्दा सोडावे लागणार हा भयावह प्रश्न निर्माण झाला आहे.यामुळे आम्हाला शेवटी सामुहिक आत्महत्या



केल्याशिवाय दुसरा पर्याय उरणार नाही याची आपण दखल घ्यावी,असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. धरणग्रस्त कृती समिती अध्यक्ष किरण क्षार व सचिव संदीप इचे यांच्यासह सिताराम राठोड,वसंत राठोड,वासुदेव पवार,छगन भाऊ जाधव,लोभासिंग राठोड,अंकुश हिवसे,सतीश मोडक,विजय मोडक,गजानन झंझाट,राजेश बारडे,सुनील मोडक,दुलीचंद राठोड, परसराम जाधव,तुकाराम जाधव,कय्युम शहा,गोकुळ जाधव,आताऊल्ला शहा, महादेव फाटे,शब्बीर शहा, रफिक शहा,मनोहर क्षार, भगवान जाधव,रहीम शहा, रूपचंद जाधव,देवकिसन राठोड,अतुल कनोजे,नामदेव जाधव,हनुमान राऊत,संदीप इचे,निखिल बरडे,योगेश राऊत,दिलीप राऊत,नथू सिंग राठोड,वासुदेव पवार,माधव क्षार,सादिक शहा,बाबू सिंग राठोड,परसराम जाधव, दत्ता थोटांगे,राजेश गिरी संजय राठोड संतोष जाधव असे असंख्य शेतकरी निवेदन देतेवेळी उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
मंगळवार, दि. २० जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# जि.प. निवडणुकीच्या गडबडीत अर्थसंकल्पाची तयारी!

## ◆प्रशासक काळातील जिल्हा परिषदेचा दुसरा अर्थसंकल्प सादर होणार!

प्रतिनिधी २० जानेवारी

**अकोला :** एकीकडे सर्वांनाच बहुप्रतीक्षेत जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीची उत्सुकता असतानाच आणि आता पहिल्या टप्प्यात अकोला जिल्हा परिषदेची निवडणूक होत नसल्याने अनेक इच्छुकांचा हिरमोड झाला आहे. यातच आता जिल्हा परिषदेत अर्थसंकल्पाची तयारी सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे. विशेष म्हणजे प्रशासक काळातील हा सलग दुसरा अर्थसंकल्प असणार असून तो फेब्रुवारी महिन्यात सादर केले जाणार आहे.

जिल्हा परिषदेचा बजेट हा जिल्ह्याच्या विकासाचा आरखडा मानला जातो. पारंपरिक पद्धतीनुसार जि. प. अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सदस्य सर्वसाधारण सभेत तासनतास या बजेटवर चर्चा करीत असत. परंतु गतवर्षाप्रमाणे यंदाही मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशानुसार १ 'प्रशासकीय' अंदाजपत्रक तयार करण्याची मंजुरी देण्यात येणार आहे. लोकप्रतिनिधी नसल्यामुळे यंदाच्या बजेटमध्ये कोणती प्राधान्ये



### आचारसंहितेच्या आडकाठीची शक्यता!

जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी २१ जानेवारीला होणाऱ्या न्यायालयीन सुनावणीनंतर निवडणूक जाहीर होण्याची शक्यता आहे. आचारसंहिता अर्थसंकल्पावर परिणाम करू शकते. त्यामुळे आचारसंहिता लागण्याआधीच बजेट सादर करण्याची शक्यता आहे, म्हणजे विकासकामे मंदावणार नाहीत.

### शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठ्यावर अधिक तरतूद!

सध्याच्या अंदाजानुसार, शैक्षणिक गरजा लक्षात घेता शिक्षण विभागावर सर्वाधिक निधी दिला जाणार आहे. आरोग्य, पाणीपुरवठा, रस्ते, रुग्णालये आणि विविध बांधकाम या विभागांनाही मोठी तरतूद मिळण्याची चिन्हे आहेत. याशिवाय पंचायत समित्यांकडून माहिती गोळा करून विविध विभागांमधील प्राथमिक कामकाज पूर्ण करण्याची प्रक्रियाही सुरू आहे.

### प्राधान्यक्रमावर राहणार लक्ष!

प्रशासनाद्वारे सादर केलेले बजेट लोकप्रतिनिधींच्या चर्चेतून तयार होणाऱ्या अंदाजपत्रकापेक्षा अधिक तातडीने आणि ठरावीक नियोजनानुसार तयार केले जाईल. यामुळे प्राथमिक विकासकामे वेळेवर सुरू होण्याची शक्यता वाढेल, मात्र नागरिक आणि स्थानिक प्रतिनिधींच्या सहभागाशिवाय कोणत्या प्राधान्यक्रमावर निधी दिला जात आहे, हे बघावे लागणार आहे.

# निवडणूक खर्चाचा हिशोब ३० दिवसाचे आत सादर करणे बंधनकारक

प्रतिनिधी २० जानेवारी

**अकोला :** अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने निवडणूक काळात उमेदवारांने केलेल्या खर्चाचा हिशोब मा.राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाचे आत अकोला महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय येथील निवडणूक हिशोब खर्च कक्ष येथे सादर करणे अनिवार्य आहे. झोन निहाय/प्रभागनिहाय निवडणूक खर्चाचा हिशोब घेण्याकरिता एकुण ६ पथकांची निर्मिती करण्यात आली आहे. कृपया संबंधीतांनी याची नोंद घेऊन अकोला महानगरपालिका प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन मनपा प्रशासनाव्दारा करण्यात येत आहे.

# 'जनता जनार्दनची सेवा हीच प्राथमिकता' - सागर भारुका

## ◆ प्रभागातील समस्या सोडवण्यासाठी सागर भारुका मैदानात



प्रतिनिधी २० जानेवारी

**अकोला :** आपल्या प्रभागाचा कायापालट करण्यासाठी आणि नागरिकांना भेडसावणाऱ्या दैनंदिन समस्या मुळापासून उपटून टाकण्यासाठी नवनिर्वाचित नगरसेवक सागर भारुका यांनी कंबर कसली आहे. प्रभागातील स्वच्छता आणि मूलभूत सोयी-सुविधांच्या कामात कोणतीही हयगय सहन केली जाणार नाही, असा सज्जड दम त्यांनी संबंधित यंत्रणेला दिला आहे.

नागरिकांच्या तक्रारींचे निवारण वेळेत होणे ही काळाची गरज असून, रेंगाळलेली कामे तातडीने पूर्ण करण्याला आपले पहिले प्राधान्य असल्याचे भारुका यांनी स्पष्ट केले. 'लोकांचे प्रश्न सुटणे महत्त्वाचे आहे, त्यात दिरंगाई झाल्यास खपवून घेतले जाणार नाही,' अशी आक्रमक भूमिका त्यांनी मांडली आहे. प्रभागातील स्वच्छता आणि नागरिकांच्या दैनंदिन समस्या सोडवण्यासाठी मी कटिबद्ध आहे. लोकांच्या कामात कसलीही टाळाटाळ किंवा हयगय मला मान्य नाही. प्रभागातील जनजीवन सुरळीत राहावे यासाठी सागर भारुका यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. आयुक्तांची भेट घेत त्यांनी विविध विषयांवर चर्चा केली. विशेषतः अस्वच्छतेचा प्रश्न आणि दैनंदिन नागरी सुविधांबाबत त्यांनी प्रशासकीय यंत्रणेला सतर्क केले आहे. प्रत्येक काम विहित वेळेत पूर्ण झाले पाहिजे, यावर त्यांचा कटाक्ष असून, नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी ते स्वतः कामाचा आढावा घेत आहेत. 'वेळेत कामे होणे हा नागरिकांचा हक्क आहे,' असे त्यांनी यावेळी सांगितले.

# उमरीत जुन्या वादातून युवकावर धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला!

## चार आरोपी पोलिसांच्या ताब्यात

प्रतिनिधी २० जानेवारी

अकोला : शहरातील उमरी परिसरात सोमवारच्या दुपारी एक थरारक घटना घडली. जुन्या वादाच्या कारणावरून दुचाकीस्वार युवकाला अडवत त्याच्यावर लोखंडी रॉड व चाकूने जीवघेणा हल्ला करण्यात आला. ही १९ जानेवारी दुपारी सिव्हिल लाईन पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका मंगल कार्यालयासमोर घडली. याप्रकरणी पोलिसांनी जीवघेणा हल्ला केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून, घटनेनंतर अवघ्या काही तासांत चार आरोपींना अटक करण्यात आली आहे.

माहितीनुसार, गुडधी रोडवरील देशमुख कॉलनीतील चाळीस क्वार्टर परिसरात राहणाऱ्या दीपाली महेंद्र मानेकर (२६) यांनी सिव्हिल लाईन पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यांच्या तक्रारीनुसार, साईनगर परिसरात राहणारा तिचा भाऊ ओम मोहन राऊत (२०) हा सोमवारी दुपारी १२ वाजताच्या सुमारास मित्रासोबत दुचाकीवरून कृषी विद्यापीठ परिसरातील येथील शिव मंदिरात दर्शनासाठी जात होता. त्यावेळी उमरीतील एका मंगल कार्यालयाजवळ गौरव सहदेव काळे (२२) याच्यासह अनुप दिनेश वाहूरवाघ (२१), अंकुश अनिल पिंपळकर (२१) आणि रोशन रामदास होपळ (२३) यांनी जुन्या वादातून त्याचा रस्ता अडवला. यावेळी अंकुश पिंपळकर याने लोखंडी रॉडने ओमच्या डोक्यावर जोरदार वार केला. त्याचवेळी गौरव काळे याने पाठीमागून चाकूने पाठीवर वार केला, तर उर्वरित दोघांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करत त्याला गंभीर जखमी केले, असे तक्रारीत म्हटले आहे. हल्ल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. सिव्हिल लाईन पोलिस ठाण्याचे पथक आणि स्थानिक गुन्हे शाखेने संयुक्त कारवाई करत आरोपींचा शोध घेऊन त्यांना ताब्यात घेतले. मंगळवारी चारही आरोपींना न्यायालयात हजर करण्यात येणार आहे.

# घुसरवाडी येथील शेतकऱ्याच्या गोठ्याला आग

प्रतिनिधी २० जानेवारी

**अकोला :** येथून जवळ असलेल्या घुसरवाडी येथील अल्पभूधारक शेतकरी अनिल शालिग्राम घावट यांच्या शेतातील गोठ्याला १७ जानेवारी रोजी संध्याकाळच्या सुमारास आग लागली. या आगीत ३५ बकऱ्यांचा होरपळून मृत्यू तर दहा बकऱ्यांचा जळून राख झाली. सविस्तर माहिती नुसार घुसरवाडी येथील अल्पभूधारक शेतकरी अनिल शालिग्राम घावट यांच्याकडे एक एकर शेती आहे. या शेतीमध्ये बकऱ्यांचे वीस बाय पन्नास चे शेड. आहे या शेडमध्ये ४५ बकऱ्या राहत असत. नेहमीप्रमाणे १७ जानेवारी रोजी अनिल शालिग्राम घावट यांनी आपल्या बकऱ्या दिवसभर चरण्याकरता सोडल्या त्यानंतर संध्याकाळी सर्व बकऱ्यांना शेडमध्ये घेऊन या बकऱ्यांचे चारापाणी करून अनिल घावट हे जेवण करण्यासाठी शेतातून घरी आले. त्यानंतर जेवण केल्यानंतर शेतात गेले शेतात गेल्यानंतर त्यांना पूर्ण बकऱ्यांचे शेड व बकऱ्यांचा मृत्यू झालेला दिसले. त्यांनी या घटनेची माहिती अकोट फाईल पोलीस स्टेशनला दिली.

# नगरसेवक हल्ला प्रकरणातील दोन आरोपींना पोलिस कोठडी

प्रतिनिधी २० जानेवारी

अकोला : शहरातील अकोट फैल परिसरात भाजपचे नवनिर्वाचित नगरसेवक शरद तुरकर यांच्यावर झालेल्या जीवघेण्या हल्ला प्रकरणी दोन आरोपींना अकोट फैल पोलिसांनी अटक केली असून, न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. नितीन नरेश राऊत आणि शेख सोहेल शेख चांद अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

१६ जानेवारी रोजी महापालिका निवडणुकीचे निकाल जाहीर झाले. अकोट फैल परिसरातील एका प्रभागातून भाजपचे उमेदवार शरद तुरकर विजयी झाले. मात्र, त्याच प्रभागातून भाजपचेच उमेदवार असलेले नितीन राऊत यांना पराभव स्वीकारावा लागला. निकालानंतर शुक्रवारी उशिरा रात्री नितीन राऊत याने शरद तुरकर यांना कार्यालयात बोलावून घेतले. यावेळी पराभवाच्या कारणावरून दोघांमध्ये जोरदार वाद झाला. या वादातूनच नितीन राऊत याने शरद तुरकर यांच्यावर वार करून गंभीर जखमी केल्याचा आरोप आहे. या घटनेनंतर अकोट फैल पोलिसांनी जीवघेणा हल्ला केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला होता.

पोलिस त्यांच्या शोधात असतानाच आरोपी शहराबाहेर पळून जाण्याच्या तयारीत असल्याची खात्रीलायक माहिती पोलिसांना मिळाली. रेल्वे स्थानकाजवळील एका हॉटेलमध्ये ते लपून बसल्याची माहिती मिळताच अकोट फैल पोलिसांनी तत्काळ छापा टाकून नितीन राऊत व शेख सोहेल यांना ताब्यात घेतले. पुढील तपास सुरू असून, पोलिस कोठडीत आरोपींकडून कसून चौकशी केली जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

सोमवारी दुपारनंतर दोन्ही आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले. सरकारी वकिलांनी तपासाच्या दृष्टीने पोलिस कोठडीची मागणी केली असता, न्यायालयाने ती मंजूर करत तीन दिवसांची कोठडी सुनावली. या घटनेमुळे परिसरात राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

# विहिरीत पडून दहा वर्षीय बालकाचा मृत्यू

प्रतिनिधी २० जानेवारी

**मुर्तीजापुर :** जुनी बस्ती पोळा चौक प्रजापती लेआउट समोर पडक्या विहिरीत पडून दहा वर्षीय बालकाचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक १८ जानेवारी रोजी संध्याकाळी घडली.



पोळा चौक या ठिकाणी जवळ असलेल्या एका शेतात उघडी पडलेली विहीर ही अनेक वर्षांपासून धोकादायक ठरत होती या विहिरीत अनेक गाई पडल्याने नुकसान झाले आहे सुरक्षेच्या दृष्टिकोनातून कोणतेच प्रकारची या वीर संदर्भात खबरदारी घेण्यात आली नाही कोणाचा परिसरात राहणारे शेख उबेर शेख फकीरा वय दहा वर्ष या बालकाचा खेळताना विहिरीकडे पाय गेल्याने उघडी पडलेल्या विहिरीत या बालकाचा मृत्यू झालेला आहे घटनास्थळीवर आमदार हरीश पिंपळे समाजसेवक शेख इमरान शेख खलील, माजी नगरसेवक इब्राहिम घाणीवाला भाजपचे गटनेते नगरसेवक गजानन नाकट, आसिफखान, उपनिरीक्षक आशिष शिंदे हेड कॉन्स्टेबल अनिल राठोड इरफान शेख नामदेव आळे विनोद कुंबरे जीवन अंभोरे घटनास्थळावर उपस्थित होते. मोठ्या प्रमाणात विहिरीच्या जवळ शहरातील नागरिकांनी गर्दी केली शेख उमर हे पाच बहिणीतून एकच भाऊ होता त्याच्या परिवारावर दुःखाचा डोंगरा कोसळल्याने सर्वत्र ठिकाणी हळहळ व्यक्त होत आहे आमदार हरीश पिंपळे यांच्या माध्यमातून पिंजर संत गाडगेबाबा बचाव आपत्कालीन पथक यांना पाचारण करण्यात आले या पथकाच्या माध्यमातून दहा वर्षे उमरचा मृतदेह बाहेर काढण्यात आला उमरच्या या घटनेला जबाबदार कोण असाही प्रश्न निर्माण होत आहे हलगर्जी आणि लापरवाहीमुळे उघडी पडलेली विहीर मृत्यूकडे निमंत्रण देत आहे या प्रकरणात पुढील तपास ठाणेदार अजित जाधव यांचे मार्गदर्शनात करण्यात येत आहे.

# घुसर येथे शेतकऱ्याची आत्महत्या

प्रतिनिधी २० जानेवारी

**अकोला :** जवळील घुसर गावात सावकारी कर्जबाजारी ला कंटाळून एका शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची हृदय द्रावक घटना १९ जानेवारी ला सायंकाळी सहा वाजता सुमारास घडली. राजू शामराव गोपनारायण वय ५० असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. गोपनारायण यांच्याकडे सुमारे पावणेदोन एकर शेती होती शेतीच्या मशागतीसाठी तसेच घरगुती गरजांसाठी त्यांनी बँक आणि खाजगी सावकाराकडून कर्ज घेतले होते कालांतराने कर्जाचा बोजा वाढत गेला आणि त्याच्यावर चार लाख रुपये कर्ज होते सततची आर्थिक अडचण कर्जफेडीचा




तगादा आणि मानसिक तणावामुळे त्यांनी टोकाचा निर्णय घेतल्याची प्राथमिक माहिती आहे शेतात मृत अवस्थेत आढळले सोमवारी सायंकाळी राजू गोपीनाथ घरी नसल्याने कुटुंबीयांनी त्यांचा शोध घेतला परिसरात शोध घेऊनही न सापडल्याने त्यांचा मुलगा तुषार व नातेवाईक शेतात गेले त्यावेळी घुसर शिवारातील त्यांच्या शेतात ते विषारी औषध प्राशन केलेल्या अवस्थेत आढळून आले ही घटना त्यांच्या स्वतःच्या शेतातच घडल्याचे समोर आले आहे कुटुंबावर डोक्याचा डोंगर पडला आहे राजू गोपनारायण यांच्या पश्चात आई भाऊ अवाहित मुलगा एक विवाहित मुलगी असा परिवार आहे.

# खामगाव अकोला मार्गावर भीषण अपघात; भरधाव कार ची ट्रकला धडक, एकाचा मृत्यू दोघे गंभीर

प्रतिनिधी २० जानेवारी

**खामगाव :** अकोला मार्गावर आज पहाटेच्या सुमारास एक भीषण अपघात घडला भरधाव वेगाने जाणाऱ्या कारने चालत्या ट्रकला मागून जोरदार धडक दिली या अपघातात एक जण जागीच ठार झाला असून दोन जण गंभीर जखमी झाले आहेत तर कार मधील आणखी एक जण सुदैवाने किरकोळ दुखापतीसह बचावला आहे प्राप्त माहितीनुसार पहाटेच्या सुमारास खामगाहून अकोल्याच्या दिशेने जाणारी कार अतिवेगात होती दरम्यान पुढे चाललेल्या ट्रकवर चालकाचे नियंत्रण सुटल्याने कारणे ट्रकला मागून जोरदार धडक दिली ही



धडक इतकी भीषण होती की कारचा पुढील भाग पूर्णतः चिरडला गेला अपघातग्रस्त कारमधील प्रवासी अडकून पडले होते अपघाताची माहिती मिळताच खामगाव ग्रामीण पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले स्थानिक नागरिकांच्या मदतीने कार मधील जखमींना पोलिसांनी बाहेर काढून उपचारासाठी तातडीने नजीकच्या रुग्णालयात दाखल केले मात्र एका प्रवाशाचा घटनास्थळीत मृत्यू झाला मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे या अपघातामुळे काही काळ खामगाव अकोला मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून वाहतूक सुरळीत केली अपघाताचे नेमके कारण अतिवेग आणि निष्काळजी वाहन चालवणे असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे याप्रकरणी खामगाव ग्रामीण पोलीस अधिक तपास करीत असून अपघातातील मृत व जखमींची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे वारंवार होणाऱ्या अपघातामुळे या मार्गावर वेग मर्यादा आणि वाहतूक नियमांचे पालन करण्याची गरज पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे

# बार्शीटाकळी शहरात अवैध धंद्यांचा सुळसुळाट

## ♦ अवैध धंद्यांवर ऑपरेशन प्रहार ची गरज

प्रतिनिधी २० जानेवारी

**बार्शीटाकळी:** बार्शीटाकळी शहरात खुलेआम दोन नंबरचे धंदे चालू असून पोलिसांचे याकडे दुर्लक्ष होत आहे. या अवैध धंद्यावर कोणीही अधिकारी लक्ष देण्यास तयार नाही. बार्शीटाकळी तालुक्यात वरली मटका, वरली टेबल खुलेआम चालू असून याकडे कोणीही लक्ष देण्यास तयार नाही. ग्रामीण भागातील गोरगरीब लोक बार्शीटाकळी येथे त्यांच्या जीवनावश्यक सामान घेण्याकरिता येतात. परंतु वरली मटका दुकानावर जाऊन पैसे गमावून बसतात. बार्शीटाकळी शहरात वरली मटका अड्डे तर खुलेआम सुरू आहेतच पण बार्शीटाकळी शहरात सर्वत्र अवैध पेट्रोल विक्रीला उधान आले आहे. बार्शीटाकळी येथे अवैध पेट्रोलची दुकाने पानपट्ट्यांसारखी सुरू आहेत जागोजागी पेट्रोलची खुली विक्री होत असून, याकडे कोणीही लक्ष देण्यास तयार नसल्याचे दिसून येत आहे. महान, पिंजर बार्शीटाकळी येथे वरली मटके खुलेआम सुरू



आहेत, याकडे एकही पोलीस अधिकारी लक्ष देण्यास तयार नाही, पोलिसांचे या अवैध व्यवसायिकांशी आर्थिक मधुर संबंध असल्याने या अवैध व्यवसायिकांचे चांगलेच फावत आहे. गोरगरिबांची एकच मागणी आहे की हे सगळे अवैद्य धंदे बंद व्हावेत. शाळेतील मुले सुद्धा या वरली अड्डयांसमोर उभे राहून वरली कशी खेळली जाते याचा अनुभव घेतात. हे पाहता याकडे वरिष्ठ अधिकारी यांनी स्वतः लक्ष घालून हे अवैद्य धंदे बंद करावेत अशी जनतेची मागणी आहे. या अवैध धंदेवाल्यांना विचारणा केली असता ते असे सांगतात की आमचे हात वरपर्यंत आहे आमचं कोणीच काही करू शकत नाही. बार्शीटाकळी शहर व ग्रामीण परिसरात सुरू असलेले हे अवैध जिल्हा पोलीस अधीक्षकांनी ज्या प्रकारे ऑपरेशन प्रहार राबवून अकोला शहरात अवैध व्यवसायिकांचा बंदोबस्त केला. त्याचप्रमाणे बार्शीटाकळी शहर व ग्रामीण परिसरात ऑपरेशन प्रहार सुरू करावे, अशी मागणी बार्शीटाकळी शहर व ग्रामीण भागातील जनता करीत आहे आहे.

# अकोली जहागीर महिला मजुर रानडुकराच्या हल्ल्यात जखमी

## ♦ चंडिकापूर वन्यप्राणी बंदोबस्त करण्याचे मागणी

प्रतिनिधी २० जानेवारी

**अकोट :** अकोट तालुक्यामधील मोठ्या प्रमाणात गेल्या काही वर्षापासून सतत होत असलेल्या वन्य प्राण्यांचा धुमाकूळ व वास्तव वाढल्याने शेतकरी मजूर वर्ग मोठ्या आर्थिक विवंच्येतेत सापडला आहे,

सोमवार दि.१९ ला सकाळी नेहमीप्रमाणे शेतात कापूस वेसणीच्या कामाला जाताना नुकतंच शेतात कामाला सुरुवात होत नाही तेव्हा उंच वाढलेल्या चंडिकापूर येथील शेतशिवारात धामणगाव रस्त्यावरील शेतात पराठीच्या शेतात कापूस वेचणी सुरू असताना पांढरे रानटी डुक्कर महिला मजुराच्या अंगावर येऊन सरळ हल्ला चढविला मोठी घटना घडली



आहे शेतामधून लक्ष्मी संतोष सोनोने, कांताबाई सुभाष सोनोने व अर्चना जगन्नाथ तायडे वय ५२ यांच्यावर पलटवार करत रानडुकरांनी मुसंडी मोठ्या दातांनी हल्ला केला यामध्ये तिन्ही बायांना मोठ्या प्रमाणात जखमी दुखापत झाल्या आहे या हल्ल्यात जीवित हानी झाली नाही हेच त्यांचे भाग्य यामधील अर्चना तायडे यांना पायाला हाताला व इतरही शरीरावर खूप मोठे दातांचे घाव डुकराने घातले आहेत अकोला रुग्णालयात उपचाराकरिता नेण्यात आले याच चंडिकापूर येथील शिवारात या अगोदर रानटी डुकरांनी अनेक वेळा मजुरावर हल्ले केल्याच्या घटना घडल्या आहेत यामध्ये शेतकऱ्यांना शेतीत काम करण्याची खूप मोठी अडचण निर्माण झाली आहे येथील राजू नाथे शेतकरी यांच्या शेतात खूप मोठा रानडुकरांचा कळप असून शेती पीक काढणे पराठी वेचणे व इतरही शेती काम धंदा करणे खूप अडचण जीव धोक्यात टाकून त्यांना करावी लागत आहे, यावेळी त्यांनी गावातील वन्य प्राण्यांचा वन विभागाने तात्काळ बंदोबस्त करावा अशी मागणी वन विभागाला केली आहे.

CLASSIFIED

अकोल्यात आता नव्याने सुरू
द पाटील फ्रुड सेंटर चायनिज
येथे तुम्हाला सर्व प्रकारचे चायनिज, नुडल्स, मनचुरियन्स राईस लालीपॅप मिळेल. वेळः सायंकाळ ४ ते रात्री ११ वार्जपर्यंत होमडिलीवर उपलब्ध आणि प्राईज फक्त ७० रुपयापासून सुरू, मग सर्वांनीच एकदा जाऊन आनंद घ्या!
-: आमचा पत्ता :-
पाटील फ्रुड सेंटर
बारा जोतिलिंग रोड जवळ करोटे ज्वेलर्स जठारपेठ चौक, अकोला
प्रतिक हिंगणकर
Mo. 7378444488

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK